अहवाल क्रमांक :१३४

पंचायती राज समिती
(२०१०-२०११)
(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

नववा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २० एप्रिल, २०१२ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१२

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

नववा अहवाल

(तीन)
पंचायती राज समिती
(२०१०-२०११)
(दिनांक ४ मार्च, २०१०)

समिती प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(चार)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,

(पाच)

पंचायती राज समिती
(२००८-२००९)
(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासून)

समिती प्रमुख

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य

*२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७ रिक्त

८ श्री.पी.एन.पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री.टी.पी..कांबळे, वि.स.स.

१९ श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

२० श्री.हेमंत पटले, वि.स.स.

(सहा)

२१ श्री.राजन तेली, वि.प.स.

२२ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२३ श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव,
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव,

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्माननीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

(सात)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा नववा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २००८-२००९ साठी गठीत झालेल्या समितीने रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेस दिनांक २, ३, व ४ जून, २०१० रोजी भेट देऊन श्री.खुशाभाऊ शिनागारे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्रीमती एस.ए.पाटोळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रत्नागिरी जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने सातारा जिल्हा परिषदेस दिनांक १५, १६ व १७ जून, २०१० रोजी भेट देऊन श्री.यशवंत शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.एस.तडकसे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेस दिनांक ७, ८, ९, व १० सप्टेंबर, २०१० रोजी भेट देऊन श्रीमती जयश्री भोज, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.गणेश पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कोल्हापूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने नाशिक जिल्हा परिषदेस दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर, २०१० रोजी भेट देऊन श्री.बी.जी.वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.न.दि.महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नाशिक जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने नंदुरबार जिल्हा परिषदेस दिनांक १३, १४ व १५ ऑक्टोबर, २०१० रोजी भेट देऊन श्री.आर.जी.कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एम.टी.गरकळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नंदुरबार जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्याबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक ०३ मे, २०११ रोजी जिल्हा परिषद, रत्नागिरी, दिनांक ०६ जुलै, २०११ रोजी जिल्हा परिषद, सातारा व दिनांक १३ जुलै, २०११ रोजी जिल्हा परिषद, कोल्हापूर, दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद, नंदुरबार व दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद, नाशिक संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधीच्या साक्षी घेतल्या.

(आठ)

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.सुमित मल्लिक, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव, गृह (तुरुंग) विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.सुमीत मल्लिक, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सुनील पोरवाल, प्रधान सचिव, जलसंधारण व रोहयो विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, स्वाधिन क्षत्रिय, प्रधान सचिव, महसूल विभाग, श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, श्री.भूषण गगराणी, सचिव, आरोग्य विभाग, श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.धवड, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले व को) वित्त विभाग, श्री.नारायणकर, सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री.अशोक जगताप, सह सचिव, नियोजन विभाग, श्री.कांतीलाल, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.ना.ड.ऐराल, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, जलसंधारण विभाग, श्री.बा.बा.नारायणकर, उप सचिव, नियोजन विभाग, डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती प्रणाली चिटणीस, उप सचिव, पदुम विभाग, श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१०-२०११ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक १७ एप्रिल, २०१२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : १७ एप्रिल, २०१२

बबनराव शिंदे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(नऊ)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	परिच्छेद क्रमांक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		प्रकरण एक **रत्नागिरी जिल्हा परिषद**		
१	१.१	पाणी शुद्धीकरण उपकरण पुरविणे योजनेतील अनियमितता	३.४१	
		प्रकरण दोन **सातारा जिल्हा परिषद**		
२	२.१	कडबाकुट्टी यंत्र खरेदी व वटपाबाबत	३.३७४	
		प्रकरण तीन **कोल्हापूर जिल्हा परिषद**		
३	३.१	मंजूर अनुदान ठेव सदरी ठेवलेबाबत	३.१३	
	३.२	कानडेवाडी (ता. गडहिंग्लज) येथील पाझर तलाव बांधकामाबाबत	३.२०६	
	३.३	मुत्नाळ, ता. गडहिंग्लज, साईट क्र.१ येथे दगडी बंधारा बाधणे	३.२०७	
		प्रकरण चार **नाशिक जिल्हा परिषद**		
४	४.१	जिल्हा परिषद आवार उपहारगृह भाडे वसुलीबाबत	३.७	
	४.२	ग्रामपंचायत तळवडे (भामेर) (ता. सटाणा) पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे कामातील अनियमितता	३.२६३	
		प्रकरण पाच **नंदुरबार जिल्हा परिषद**		
५	५.१	४ टक्के सादिल अनुदानातून मुलांना बसण्यासाठी सुती बस्करपटया खरेदीबाबत	३.४७	
		परिशिष्ट समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त		

प्रकरण एक

रत्नागिरी, जिल्हा परिषद

पाणी शुद्धीकरण उपकरण पुरविणे योजनेतील अनियमितता - (परिच्छेद क्र.३.४१)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र. १८) जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी शाळा पाणी शुद्धीकरण उपकरणे पुरविणे करीता एकूण रु.२,५५,८८,८३२/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१. खरेदी करण्यापूर्वी एकूण खरेदीचा कृती आराखडा तयार करुन त्याला जिल्हा परिषद व शासनाची मंजूरी घेतलेली नाही. प्रत्येक वेळी खरेदी करताना प्रथम ७५ पटसंख्या असणाऱ्यांना सयंत्र नंतर २०० पेक्षा जास्त पटसंख्या असणाऱ्यांना दोन सयंत्र अशाप्रकारे जिल्हा परिषदेने धोरण बदलेले आहे. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२. कन्सेप्ट मार्केटिंग कंपनीशी दरकरार केला आहे. दरकराराच्या झेरॉक्स प्रती जिल्हा परिषदेकडे आहेत. जिल्हा परिषदेने उद्योग संचालनालयाकडून दरकरार मागविलेले नाहीत. त्यामुळे अशा प्रकारचे सयंत्रासाठी आणखी किती दरकरार आहेत याची अचुकता पडताळता आलेली नाही.

३. खरेदी केलेली सयंत्रे आयएसआय मार्क नाहीत. तरी सयंत्राच्या गुणवत्तेवर खात्री पटवावी.

४. दिनांक १० जानेवारी, २००५ ची कार्यालयीन टिप्पणी पहाता सर्व शिक्षण अभियानाखाली ज्या २१२ शाळा विद्युतीकरण करण्यात येणार होते त्यांच्यासाठी ही खरेदी केलेली आहे. तरी सर्व शाळांना विद्युतीकरण झाले असल्याची खात्री पटवावी.

५. सदरची सयंत्रे कोणत्या कंपनीचे आहेत याचा कोणताही उल्लेख नाही.

६. पुरवठादाराची बिजके पहाता यामध्ये विक्रीकर स्वतंत्र दर्शविलेला नाही. विक्रीकराचा तपशील मागवून विक्रीकर शासनाकडे जमा झाल्याचे प्रमाणपत्र विक्रेत्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

७. शासन निर्णय दिनांक २ जानेवारी, १९९२ मध्ये मध्यवर्ती भांडार खरेदीचे दरकरार करणारे परिशिष्ट क्र.६ मध्ये या सयंत्राचा समावेश नाही.

८. पुरविण्यात आलेल्या सयंत्राचा मशिन क्रमांक, उत्पादक बॅच क्रमांक व दिनांक नमुद नाही.

९. पुरवठादाराबरोबर करारनामा केलेला नाही. बँक गॅरंन्टी नाही. अनामत कपात केलेली नाही.

उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. जिल्हा परिषदेने ११ व्या वित्त आयोगामधून पाणी शुद्धीकरण उपकरण घेण्याकरीता पत्र क्र.रजिप/शिक्षण/११ वा वि.आ./६०१०/०३-०४ दिनांक २३/३/२००४ ने शासनाकडे प्रस्ताव सादर करुन शासनाकडील पत्र क्र.आविआ/२००२/प्रक्र.१६८/वित्त ४ दिनांक २५/३/२००४ ने शासनाची मंजूरी घेण्यात आलेली आहे.

११ व्या वित्त आयोगामधून शिक्षण विभागाला ज्यावेळी निधी उपलब्ध झाला त्यावेळी जिल्हा परिषदेच्या मान्यतेने ठराव क्र.२९३ दिनांक १५/५/२००४, ठराव क्र.३४३ दिनांक ८/१०/२००४, ठराव क्र.३९९ दिनांक ६/१/२००५ अन्वये खरेदी करण्यात आली आहे अकराव्या वित्त आयोगाचा निधी खर्च करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला असल्याने जिल्हा परिषदेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार धोरण ठरविण्यात आलेले आहे.

२. उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र. एसपीसी /आरसीडी/ वॉटरफिल्टर/२७/८-१०४३०/२००३-०४ दिनांक ८ जुलै, २००३ ने कन्सेप्ट मार्केटिंग कंपनीशी केलेल्या दरकरारानुसार खरेदी करण्यात आलेली आहे. सयंत्रासाठी अन्य कोणाकडूनही दरकरार प्राप्त झालेला नाही.

३. सयंत्राची खरेदी शासनाने दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या तपशीलाप्रमाणे करण्यात आलेली आहे. गुणवत्तेची खात्री पुरवठादारांकडून सादर केलेल्या हाफकीन संस्था व पुणे विद्यापीठाकडील प्रमाणपत्रानुसार करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सयंत्राची तांत्रिक तपासणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी यांचेकडून करण्यात आलेली आहे.

४. सर्वशिक्षा अभियनांतर्गत सन २००४-०५ या वर्षासाठी घेण्यात आलेल्या २१२ शाळांचे विद्युतीकरण पूर्ण झालेले आहे.

५. सदरची सयंत्रे मोनिबा यु.व्हि.स्टोरेज प्युरिफायर या कंपनीची आहेत. दप्तरी त्याची नोंद आहे. (शासन पत्रक दि.०३/१२/२००३)

६. दरपत्रकाच्या किमतीमध्ये विक्रीकराची रक्कम अंतर्भूत केलेली असल्यामुळे विक्रीकराची रक्कम देयकात स्वतंत्र दाखविण्यात आलेली नाही. विक्रीकराची रक्कम पुरवठादाराने शासनाकडे जमा केलेली आहे. तसेच विक्रीकर खात्याचे क्लीअरन्स सर्टीफिकेट प्राप्त झालेले आहे.

७. खरेदी शासनाच्या उद्योग संचालनालयाच्या दरकरारा प्रमाणे करण्यात आलेली आहे.

८. क्वॉलिटी इंन्शुरन्स रिपोर्टमध्ये बॅच क्रमांक, दिनांक नमुद केलेला आहे.

९. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेशी पुरवठादाराने दरकरार केलेला असल्याने अनामत रक्कम व बँक गॅरेंटी त्यांच्याकडे जमा केलेली आहे. तसेच करारातील सर्व अटी व शर्ती पुरवठादराला लागू असल्याने पुन्हा करारनामा करण्यात आलेला नाही.

१०. एक वर्षाच्या कलावधीत सयंत्रे बिघडल्यास त्याची दुरुस्ती विना आकार करुन देण्याबाबत मक्तेदारानी हमी घेतलेली आहे. हमी कालावधीमध्ये मुख्याध्यापकाकडून प्राप्त तक्रारी नुसार एकुण २६ सयंत्रे नादुरुस्त असल्याचे अहवाल होते. त्याप्रमाणे ही सयंत्रे हमी कालावधीमध्ये दुरुस्त करुन देण्यात आलेली आहे. त्याबद्दलचा अहवाल उपलब्ध आहे.

मुख्य कार्यकारी अधिकार यांची साक्ष :-

उक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची दिनांक २ जून, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाणी शुद्धीकरण उपकरणे किती लोक वापरतात व किती सयंत्रे दुरुस्त करण्यात आली तसेच ज्या शाळांना ही यंत्रे पुरविण्यात आली आहेत, त्या शाळांना विजेची जोडणी आहे काय व ज्या शाळांना विजेची जोडणी नाही त्या शाळांना ही यंत्रे का देण्यात आली. त्यावर शिक्षणाधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, पाणी शुद्धीकरण उपकरणे २,२२७ खरेदी करण्यात आली. त्यापैकी काही ठिकाणी ही यंत्रे वापरात आहेत तर काही ठिकाणी ती नादुरुस्त आहेत. अशा एकूण २,७३० शाळा असून त्यापैकी ३५८ शाळांना सध्या वीज उपलब्ध नाही. ज्या शाळांना वीजेचा पुरवठा नव्हता अशा २१२ शाळांना सर्व शिक्षा अभियानामधून प्रत्येकी रु. ५,०००/- भरून वीजेची जोडणी देण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यावर पुन्हा समितीने विचारणा केली की, २,७३० शाळांपैकी किती शाळांना वीज पुरवठा नाही परंतु यंत्रे देण्यात आली आहेत आणि किती शाळा अजून शिल्लक राहिल्या आहेत. त्यावर असे सांगण्यात आले की, सर्व शाळांपर्यंत यंत्रे पोहचली आहेत. खेड तालुक्यामधील ६ शाळांमध्ये विद्युत पुरवठा नाही. याबाबत विचारणा करण्यात आली की, सयंत्राच्या गुणवत्तेबाबत पुणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र आपण घेतले आहे काय, त्यावर होय असा खुलासा करण्यात आला असता त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सयंत्रे आय.एस.आय.मार्कची नसताना आपण ती कां खरेदी केली, किती सयंत्रे चालू नाहीत, यावर शिक्षणाधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, शासनाच्या दर करारानुसार संबंधित कंपन्याकडून ही यंत्रे खरेदी करण्यात आली. ज्याठिकाणी विद्युत पुरवठा आहे त्याठिकाणी सयंत्रे चालू आहेत. ज्यांच्या कँडल खराब झालेल्या आहेत त्या बदलण्यासाठी त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. आता किती सयंत्रे बंद आहेत हे आपल्याला सांगता येणार नाही. त्याबाबतची माहिती १५ दिवसात देण्यात यावी असे समितीने निदेश दिले. ही यंत्रे खरेदी करण्यापूर्वी शासनाची मंजूरी घेण्यात आलेली आहे असेही समितीस सांगण्यात आले.

समितीने विचारणा केली की, सन २००३-०४ मध्ये मंजूरी आल्यानंतर मार्च-एप्रिल महिन्याच्या कालावधीत बसविण्यात आलेल्या यंत्रापैकी किती शाळांमध्ये ही सयंत्रे चालू आहेत. या यंत्रामधून पाणी शुद्ध होते काय आणि त्या यंत्राची आजची किंमत किती आहे. त्यावर शिक्षणाधिका-यांनी खुलासा केली की, त्यावेळी यंत्राची किंमत ११,१३९ रुपये होती. दर करारानुसार ही यंत्रे खरेदी करण्यात आली. या यंत्राची आजची किंमत सांगता येणार नाही. समितीने पुन्हा विचारणा केली की, आपण किती यंत्रे दुरुस्त केली, ती कोणत्या कारणांनी नादुरुस्त होती. त्यावर विभागाने, २६ यंत्रांच्या दुरुस्तीबाबत तक्रारी आल्या होत्या. त्या यंत्रामध्ये कँडल बदलण्याची गरज नाही. तसेच शॉक बसत असल्याने वायर दुरुस्त करण्यात आल्या.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली.

१. रत्नागिरी, जिल्हा परिषदेतील किती शाळांना पाणी शुद्धीकरण उपकरणांचा पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता व सदर निर्णय घेताना कोणत्या बाबी अथवा निकष निश्चित करण्यात आले होते, सदर निकषानुसार किती पाणी शुद्धीकरण उपकरणे खरेदी करणे आवश्यक होते.

२. पाणी शुद्धीकरणाची उपकरणे प्रत्यक्ष शाळास्तरावर केव्हा वितरीत करण्यात आली व त्याचा प्रत्यक्ष वापर केव्हापासून करण्यात येत आहे.

३. पाणी शुद्धीकरणांच्या देखभाली संदर्भात कोणती व्यवस्था करण्यात आली आहे अथवा त्याबाबतची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात आली आहे.

४. सद्यस्थितीत किती शाळांमध्ये पाणी उपकरणे सुरु आहेत व किती बंद आहेत ? बंद असल्यास, ती किती दिवसांपासून बंद आहेत याचा आढावा घेऊन संबंधितांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत.

५. वास्तविकता ज्या शाळांना विद्युत पुरवठा नाही अशा शाळांचा अंर्तभाव सदर योजनेत न करता त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता शाळांना सदर उपकरणे पुरविण्यात आली असून त्यांना अद्यापर्यंत विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही ही बाब समितीला जिल्हा परिषद भेटीच्या वेळी निदर्शनास आली यावरुन पाणीशुद्धीकरण यंत्रे पुरविण्यामागचा शासनाचा उद्दात हेतू फलद्रुप होवू शकला नाही. यास कोण जबाबदार आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीला खालील माहिती प्राप्त झाली :-

१. रत्नागिरी जिल्हा परिषदेतील २६६० शाळांपैकी २११४ शाळांना २२२७ उपकरणांचा पुरवठा करणेत आलेला आहे. सदर निर्णय घेताना शाळांच्या पटाच्या उतरत्या क्रमाने शाळा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. २० पेक्षा अधिक पट असलेल्या शाळांना सदर संचाचा पुरवठा करण्यात आलेला आहे ही प्रक्रिया होताना शिक्षण समिती, स्थायी समिती, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यांचे ठरावानुसार तसेच सदर योजनेला शासनाची पुर्व मंजूरी घेऊन पुरवठ्याची कार्यवाही केलेली आहे.

२. सन २००४-०५ या आर्थिक वर्षात प्राप्त अनुदानानुसार (माहे एप्रिल, २००४, जुलै, २००४, सप्टेंबर, २००४, ऑक्टोबर, २००४, डिसेंबर, २००४, जानेवारी, २००५ व मार्च, २००५) वेगवेगळ्या टप्प्यात पाणी शुद्धीकरण उपकरणे खरेदी करण्यात आलेली आहेत. व पुरवठा आदेशानंतर साधारणतः १५ दिवसात तालुका स्तरावर उपकरणे प्राप्त झालेली असून त्यानंतर ती शाळेवर त्वरीत पोहोच करण्यात आलेली आहेत व त्याचवेळी वापरात आलेली आहेत.

३. एक वर्षाची वॉरंटी नंतर स्वतंत्रपणे कार्यवाही केली नसली तरी सर्व गट शिक्षणाधिकारीमार्फत ४% सादील व सर्व शिक्षाअभियान शाळा अनुदानातुन या सयंत्राची दुरुस्ती करणेबाबत कळविणेत आले आहे.

४. यानुसार सद्यःस्थितीत ८३१ संयंत्रे सुरु असून उर्वरित सयंत्रांपैकी ७४७ संयंत्रे फक्त कॅडल फिल्टरवर सुरु आहेत व ६४९ संयंत्रे पूर्णपणे नादुरुस्तीमुळे बंद आहेत. याबाबत गट शिक्षाणाधिकारी स्तरावरुन सयंत्राच्या दुरुस्तीबाबत सुचना देऊन त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास जबाबदारी निश्चित करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

५. वीज पुरवठा नसलेल्या खेड तालुक्यातील ६ शाळांना वीज पुरवठा नव्हता तरीसुद्धा या शाळांना उपरोक्त संच पुरवण्यात आले होते कारण त्याच वर्षी सर्व शिक्षा अभियान व शैक्षणिक उठावातून विद्युत पुरवठा सन २००४-०५ या वर्षामध्ये उपलब्ध केले आहे. सध्या या ६ शाळांमधून वीज पुरवठा आहे.

सचिवांची साक्ष :-

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ मे, २०११ रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ज्यावेळी समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली होती, त्यावेळी त्यांना असे सांगण्यात आले होते की, २१२ शाळांना वीजेची जोडणी नसल्यामुळे पाणी शुद्धीकरण यंत्रे पुरविण्यात आलेली नाहीत. तथापि, सर्वशिक्षा अभियानामधून प्रत्येकी ५ हजार रुपये भरून विद्युत पुरवठा देण्याची कार्यवाही सुरु आहे. ज्या शाळांसाठी ५ हजार रुपये भरण्यात आले त्या सर्व शाळांना वीजेची जोडणी मिळाली आहे का व त्या शाळांना पाणी शुद्धीकरण यंत्रे पुरविण्यात आली आहेत का या समितीच्या प्रश्नावर शिक्षणाधिकाऱ्यांनी खेड तालुक्यातील ६ शाळा आहेत असे सांगितले. २७३० शाळांपैकी ३५८ शाळांना वीज जोडणी नाही. या ३५८ शाळांपैकी २१२ शाळांचे प्रत्येकी ५ हजार रुपये भरून वीज जोडणी देण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सर्व शिक्षा अभियानामधून ज्या शाळांसांठी ५ हजार रुपये भरण्यात आले होते त्या सर्व शाळांना वीजेचा पुरवठा मिळाला आहे असे नमूद केले.

उर्वरित १४६ शाळांबाबत कोणती उपाययोजना केली आहे, या शाळांना विद्युत पुरवठा मिळाला आहेका व त्यांना यंत्रे पुरविण्यात आली आहेत का, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर समितीला शिक्षण अधिकाऱ्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, एकूण २२२७ यंत्रे घेण्यात आली होती व ही २२२७ यंत्रे २११४ शाळांना पुरविण्यात आली आहेत. तसेच सचिव, ग्रामविकास विभाग यांनी, ज्या शाळांची पटसंख्या जास्त आहे त्यांना दोन यंत्रे देण्यात आली आहेत असा खुलासा केला. ११ व्या वित्त आयोगातील निधीमधून जास्तीत जास्त शाळांना यंत्रे पुरविलेली आहेत उर्वरित शाळांना राज्य शासनाच्या इतर योजनामधून पाणी शुद्धीकरण यंत्रे पुरविली पाहिजेत अशी अपेक्षा आहे, असे स्पष्ट केले.

त्याबाबत पाणी पुरवठा सचिवांनी खुलासा केला की, पाणी पुरवठा करण्याकरिता निधी उपलब्ध आहे. प्रत्येक जिल्ह्याला राष्ट्रीय पेयजल अंतर्गत निधी देण्यात आलेला आहे. फक्त या कार्यक्रमामध्ये नवीन शाळांचा समावेश करण्यात आलेला नाही. समितीने अशी विचारणा केली की, २७३० शाळांपैकी नवीन शाळांची संख्या किती आहे. त्यावर शिक्षणाधिकाऱ्यांनी ३५ शाळा नवीन असल्याचे सांगितले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५०३ शाळांपैकी u उर्वरित शाळांना पाणी पुरवठा केला पाहिजे. निधी उपलब्ध असताना यंत्रे का दिली नाहीत. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, सदरचा निधी हा पाणी पुरवठ्यासाठी आहे. पाणी शुद्ध्ीकरण यंत्रासाठी या योजनेचा निधी नाही. तसेच सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदीत केले की, ११ व्या वित्त आयोगामधून राज्याने कोणत्या योजना घ्याव्यात हे केंद्र शासनाने ठरवून दिले होते. त्याप्रमाणे पाणीशुद्धीकरण यंत्रे प्रत्येक शाळांमध्ये बसविण्यासाठी निधी देण्यात आला होता व १२ व्या वित्त आयोगाने पाणी पुरठा व स्वच्छतेला प्राधान्य दिले होते. त्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन, गटारे वगैरे योजना घेण्यात आल्या होत्या. १३ व्या वित्त आयोगाने राज्याला

कोणतीही योजना ठरवून दिलेली नाही. १३ व्या वित्त आयोगातील निधी खर्च करण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी स्वतःच्या योजना तयार करावयाच्या आहेत किंवा हा निधी कोणत्या कामावर खर्च करावयाचा हे ठरवावयाचे आहे. प्रशासनाने चांगल्या कामासाठी हा निधी वापरावा, अशा सूचना केंद्र शासनाने दिलेल्या आहेत. ११ व्या वित्त आयोगामधील योजनेतून ज्या शाळांना पाणी शुद्धीकरण यंत्रे पुरविण्यात आलेली नाहीत, त्या शाळांना राज्याच्या इतर योजनांमधून ती पुरवावी लागतील. ज्या शाळांमध्ये शुद्धीकरण यंत्रे उपलब्ध नाहीत, त्या शाळांना पाणी शुद्धीकरण पावडर पुरविण्यात येते. या योजनेमधून जरी निधी शिल्लक नसला तरी जिल्हा परिषद स्वनिधीतून या शाळांना शुद्धीकरण यंत्रे पुरवू शकली असती. ज्यावेळी समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली, त्यावेळी ६४९ यंत्रे बंद अवस्थेत होती. याबाबत समितीने चिंता व्यक्त केली व सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली. त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, पाणी शुद्धीकरण यंत्रातील कँडल्स दोन-तीन वर्षांनी बदलाव्या लागतात. त्याप्रमाणे सादिलमधून खर्च करावा व कँडल्स बदलण्यात यावीत, अशा प्रकारच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या होत्या. तथापि, या यंत्रामधील नादुरुस्त अल्ट्राव्हायलेट सिस्टिम दुरुस्त करावयाची असेल तर त्यासाठी मोठा खर्च येतो, ही यंत्रे विकत घेऊन ५ वर्षांचा कालावधी लोटला आहे. जिल्हा परिषदेने कँडल्स बदललेल्या आहेत. ज्या शाळांमधून कँडल्स बदलण्यात आलेली नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्याची सूचना देण्यात आलेली आहे. तथापि, अल्ट्राव्हायलेट सिस्टिम नादुरुस्त असेल तर ती दुरुस्त केली पाहिजे किंवा नवीन यंत्र विकत घेतले पाहिजे. परंतु, त्यासाठी मोठा निधी लागणार आहे. जानेवारी, २०११ अखेर ६४९ यंत्रे बंद आहेत. ७४७ यंत्रामधील कँडल्स बदलण्यात आल्या आहेत व ती यंत्रे सुरु आहेत.

अभिप्राय व शिफारशी :-

रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शाळांना पाणी शुद्धीकरण यंत्रे पुरविणे या योजनेतील झालेली अनियमितता याबाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा परिषेदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, शाळांना पाणी शुद्धीकरण उपकरणे पुरविण्या करिता एकूण रु.२,५५,८८,८३२/- एवढा खर्च करण्यात आला आहे. प्रत्यक्षात रु.२,५२,०७,४१३/- एवढा निधी खर्च झाला.

रत्नागिरी जिल्हा परिषदेने सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २००४-२००५ या वर्षात पाणी शुद्धिकरण उपकरणे २,२२७ खरेदी करण्यात आली होती. जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण २,७३० शाळांपैकी ३५८ शाळांना विद्युत पुरवठा नाही. सर्व शिक्षा अभियानामधून २१२ शाळांचे प्रत्येकी ५ हजार रुपये भरुन विद्युत पुरवठा करण्यासंदर्भात सूचना दिल्या असल्याचे सांगितले. उर्वरित १४६ शाळांना विद्युत पुरवठा करण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नाही असे समितीच्या निदर्शनास आले. जिल्हा परिषदेने २,२२७ यंत्रे खरेदी केली असून सदरची यंत्रे २,११४ शाळांना पुरविण्यात आली. २,२२७ यंत्रापैकी ६४९ यंत्रे बंद होती. पाणी शुद्धीकरण यंत्रातील कँडल्स दोन-तीन वर्षांनी बदलण्यात याव्यात

अशा सूचना देण्यात आल्या होत्या. यंत्रामधील नादुरुस्ती अल्ट्राव्हायलेट सिस्टिमची दुरुस्ती करावयाची असेल तर त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करणे आवश्यक होते अशी खर्चाची कारणे सांगून संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे सुद्धा समितीला दिसून आले.

विद्युत पुरवठ्याची रक्कम भरुनही शाळांना विद्युत पुरवठा न झाल्यामुळे व त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनीही दूर्लक्ष केल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली. सबब, शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याची बाब विचारात घेता **समिती शिफारस करते की, विद्युत पुरवठा न करण्यात आलेल्या शाळांना विद्युत पुरवठा करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, त्या ठिकाणी पाणी शुद्धीकरण यंत्रेही बसविण्यात यावीत. त्यासाठी स्वनिधीतून आवश्यक तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याचप्रमाणे नादुरुस्त पाणी शुद्धीकरण यंत्रेही तातडीने दुरुस्त करुन घेण्यात यावीत जेणेकरुन शालेय विद्यार्थ्यांना पाण्यामुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध घातला जाईल.**

समितीने उक्त केलेल्या शिफारशीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.

प्रकरण दोन

सातारा, जिल्हा परिषद

कडबाकुट्टी यंत्र खरेदी व वाटपाबाबत (परिच्छेद क्रमांक ३.३७४)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र. ६) सातारा जिल्हा परिषदेमार्फत कृषि विभागाने जिल्हा परिषद निधीतून कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी रुपये ४,९९,१००/- इतका खर्च केला आहे. त्यावर खालील अभिप्राय आहेत.

१. कृषि समितीच्या मान्यतेने लाभार्थी यादी निश्चित न करता खरेदी केलेली आहेत.

२. कडबाकुट्टी यंत्रांचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर केलेला असल्याने यंत्रे योग्य त्या निकषाप्रमाणे असल्याबाबत कृषि विकास अधिकारी यांनी खात्री केलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

३. पंचायत समितींना दर बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री करण्याचे आदेश कृषि विभागाने दिलेले आहेत. खरेदी जिल्हा स्तरावरील असल्याने दराबाबतची खात्री कृषि विभागाने करुन घेणे आवश्यक आहे, परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

४. कडबाकुट्टी यंत्रे उशिराने पुरविल्याने लाभार्थीना त्याचा वेळेत लाभ मिळालेला नाही. पुरवठा आदेशामध्ये दंडाची तरतुद केलेली नाही. सदोष आदेश पारित केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच जबाबदार व्यक्तींकडून दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१. जिल्हा परिषद सेस सन २००४-२००५ अंतर्गत गट पातळीवरुन वाटप केलेल्या कडबाकुट्टी यंत्रांचे लाभार्थी यादीस कृषि समिती सभा दिनांक २/६/२००६ मधील ठराव क्रमांक ४६४ अन्वये कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे. तसेच यापुढे लाभार्थी निश्चित करुन व कृषि समिती सभेची मान्यता घेऊन आवजारांची खरेदी प्रस्तावीत करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

२. शासकीय तसेच जिल्हा परिषद योजने अंतर्गत पुरवठा होणाऱ्या औजारांची तपासणी त्रयस्थ संस्थेकडून केली असून तपासणीचे प्रमाणपत्र सोबत उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच मालाचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर झाल्यानंतर सदरची कडबाकुट्टी यंत्रे सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करुन डिलीव्हरी चलनावर गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित केले आहे. त्यामुळे पुरवठा आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

३. योजनेअंतर्गत खरेदी होणाऱ्या सर्व औजारांची शासकीय किंमत खुल्या बाजारातील दरापेक्षा अधिक नसल्याची खात्री जिल्हा स्तरावरुन जिल्हा कृषि अधिकारी, मोहिम अधिकारी यांनी केली आहे. सदरचे प्रमाणप्रत्र लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

४. शकात नमूद केलेप्रमाणे पुरवठा आदेशामध्ये माल पुरवठा होण्यामधील विलंबापोटी दंडाची तरतुद केली नसली तरीसुद्धा शासकीय नियमानुसार महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून दंडाची रक्कम रुपये १४,६०१/- वसूल करणेत आलेली असून सोबत चलन सादर केले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी समितीने, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा यांची दिनांक १५ जून, २०१० रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी, समितीने अशी विचारणा केली की, या परिच्छेदामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नाही असे सांगितले, त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, लाभधारकाची निवड केली नसताना, कडबाकुट्टी यंत्राची खरेदी का करण्यात आली, त्यावर सांगण्यात आले की, दिनांक ०२/६/२००६ रोजी कृषि समितीची सभा घेण्यात आली होती त्यावेळी ठराव क्रमांक ४६४ अन्वये कार्योत्तर मान्यता घेतली होती. समितीने पुढे असेही विचारले की, अगोदर वाटप करण्यात आले आणि नंतर मान्यता घेण्यात आली होती काय, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सांगितले की, ही योजना निश्चित केल्यानंतर लाभधारक ठरविण्यात आले नव्हते परंतु नंतर लाभधारकांची निवड होईल असे अपेक्षित होते.

जिल्हा परिषद निधीतून कडबाकुट्टी यंत्र खरेदी करण्यासाठी ५ लाख रुपयांचा खर्च कोणी केला, असे समितीने विचारले असता त्यावर सांगण्यात आले की, या संदर्भात कृषी विभागामर्फत कार्यवाही करण्यात येते. ज्या अधिकाऱ्यांनी अगोदर कृषी समितीची मान्यता घेतली नाही, त्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी असे समितीने निर्देश दिले असता, त्यावर कृषी विकास अधिकाऱ्यांनी सांगितले की, सन २००४-२००५ साली गट पातळीवरुन कडबाकुट्टी यंत्राची मागणी करण्यात आली होती. जिल्हा परिषदेकडे एकत्रितपणे मागणी केल्याप्रमाणे

यंत्राची खरेदी करण्यात आली होती. समितीने पुढे अशी ही विचारणा केली की, कृषी समितीपुढे हा विषय ठेवण्यात आला होता काय, कोणाच्या अधिकारामध्ये ही खरेदी करण्यात आली, कृषी समितीची मान्यता घेण्यात आली नव्हती काय, त्यावर कृषी विकास अधिकाऱ्याने कार्योत्तर मान्यता घेण्यात आली होती असे समितीस विदित केले. अगोदर लाभधारकांची यादी निश्चित करावयास पाहिजे होती असे समितीने आपले मत व्यक्त केले असता त्यावर कृषी विकास अधिकाऱ्यांनी गट पातळीवर लाभधारकांची निवड केली होती असे समितीस सांगण्यात आले.

लेखा परिक्षकांनी आक्षेप घेण्याची कारणे काय, लाभधारकांची निवड कोणी केली व कशी केली, त्यावेळी १०० अर्ज आले असतील तर त्याला मान्यता केणी दिली, अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर कृषी विकास अधिकाऱ्यांनी गट पातळीवर लाभधारकांची निवड करण्यात आली होती व विविध पंचायत समित्याकडून ३७० अर्ज प्राप्त झाले होते, असा खुलासा केला असता, त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, त्याला मान्यता कोणी दिली, त्यावर जून, २००६ मध्ये मान्यता घेतली होती असे सांगण्यात आले. एवढ्या उशिराने मान्यता घेतली, हे यावरुन स्पष्ट होते असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने पुढे अशी ही विचारणा केली की, कडबाकुट्टी यंत्रांची खरेदी केव्हा केली आणि मान्यता केव्हा घेतली होती, यावर सांगण्यात आले की, दिनांक ९/११/२००४ रोजी कडबाकुट्टी यंत्राची खरेदी करण्यात आली आणि दिनांक २/६/२००६ रोजी कार्योत्तर मान्यता घेतली होती. यामध्ये किती कालावधी गेला, खरेदी समितीची मान्यता न घेता ही खरेदी केली होती हे खरे आहे काय, याबाबत समितीने खुलासा विचारला असता, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने काहीच खुलासा केला नाही. लेखा आक्षेपामध्ये हे मुद्दे नंतर काढले होते काय, लेखापरिक्षकांचे म्हणणे खरे आहे की, जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे खरे आहे, यावर मुख्य लेखा परीक्षक यांनी सांगितले की, लेखापरिक्षकांनी काढलेले आक्षेप योग्य असल्याचे मत व्यक्त केले.

लाभधारकांची यादी पंचायत समितीच्या स्तरावर तयार करण्यात आली होती. जिल्हा परिषदेने अंतिम यादी तयार करुन घेतली व जेवढे अनुदान होते तेवढ्या लाभधारकांना कडबाकुट्टी यंत्र मंजूर केले. खरेदी करण्यासाठी आपल्याकडे खरेदी समिती होती काय, नसेल तर ही खरेदी कोणी केली होती अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर कृषि विकास अधिकाऱ्यांनी सांगितले की, समितीमध्ये या संदर्भात चर्चा झाली होती. खरेदी समितीने चर्चा करुनच कडबाकुट्टी यंत्रे खरेदी करण्यात आली होती, त्यावर पुन्हा समितीने विचारणा केली की, महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाकडून खरेदी करण्यात आली होती काय, त्यावर कृषी विकास अधिकाऱ्याने समितीस होय असे सांगितले. लेखापरिक्षकांनी असा आक्षेप घेतला होता की, कडबाकुट्टी यंत्राचा पुरवठा, पंचायत समिती स्तरावर केलेला असल्याने, यंत्रे योग्य त्या निकषाप्रमाणे असल्याबाबत कृषी विकास अधिकाऱ्यांनी खात्री केलेली नाही, तेव्हा ही खात्री कोणी केली होती, त्यावर विभागाने उत्तर दिले नाही. या परिच्छेदाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

१. एकूण किती यंत्रे खरेदी करण्यात आली ?

२. सदर यंत्रे दिनांक ९ नोव्हेंबर, २००४ रोजी खरेदी करण्यात येवून त्यास दिनांक २ जून, २००६ मध्ये कार्योत्तर मान्यता घेण्यात आली. तथापी, सदर खरेदीस खरेदीपूर्व समितीची मान्यता न घेण्याची काय कारणे आहेत ?

३. सदर यंत्रांचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर केलेला असल्याने तो योग्य त्या निकषात बसत नाहीत असा लेखा अधिकाऱ्याने आक्षेप घेतलेला आहे. हे खरे आहे काय ?

४. असल्यास, सदर निकष कोणते व त्याचे उल्लंघन कशाप्रकारे करण्यात आलेले आहे ? या प्रकरणी दोषी आढळून आलेल्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे.

यावर जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली :

कृषी विभागाने सन २००४-२००५ मध्ये जिल्हा परिषद सेस निधीमधून एकूण १६१ कडबाकुट्टी यंत्रे खरेदी केली आहेत.

सदर यंत्रे दि.९/११/२००४ रोजी खरेदी करण्यात आली असून सदर खरेदीस कृषि समितीची सभा दि.३/७/२००४ मधील ठराव क्र.२४० अन्वये मान्यता घेणेत अली आहे. खरेदी पूर्वी मान्यता घेणेत आलेली आहे.

नाही. पंचायत समिती स्तरावर पुरवठा करणेत आलेल्या कडबाकुट्टी यंत्राची तांत्रिक तपासणी दि.१५/२/२००५ रोजी करणेत आली असून गुणवत्ता आश्वासन अधिकारी यांचे तपासणी प्रमाणपत्र घेणेत आलेले आहे. तसेच गट विकास अधिकारी यांना पुरविणेत आलेली अवजारे/साहित्य नमुनाबर हुकूम, सुस्थितीत प्राप्त झालेचे प्रामणपत्र पोहोच पावतीसह दिलेले आहे.

गुणवत्ता आश्वासन अधिकारी यांनी तांत्रिक निकषानुसार कडबाकुट्टी यंत्र असलेबाबत दि.१५/०२/२००५ अन्वये प्रमाणपत्र दिलेले आहे.

सचिवांची साक्ष :

सातारा जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक ०६ जुलै, २०११ रोजी सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी कडबाकुट्टी यंत्रे खरेदी संदर्भात खुलासा करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले असता, त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करुन मान्यता नंतर घेण्यात आली असल्याचे मान्य केले. यंत्रे खरेदीसाठी आधीच मान्यता घेतली होती व तसे गट विकास अधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते लाभार्थ्यांची नावे देखील मान्यता करुन घेणे आवश्यक असते. त्याप्रमाणे प्रत्येक गटनिहाय (ब्लॉक) लाभार्थ्यांची मान्यता घेतली होती, या नंतर यंत्रे खरेदी करण्यात आली. तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून तपासून यंत्रे खरेदी करण्यात आली होती. वाटप झाल्यानंतर नावाची यादी तयार केली. यास सुरुवातीला मंजुरी घेतली होती असे सांगितले असता, यावर समितीने विचारणा केली की, सन २००४ मध्ये वाटप झालेले आहे. गुणवत्ता आश्वासन अधिकारी यांचे दि.१५/२/२०५ रोजी प्रमाणपत्र दिलेले आहे. यावर सचिवांनी सांगितले की, खरेदी झाल्यानंतर वाटपाच्या आधी गुणवत्ता प्रमाणपत्र

घेण्यात आलेले आहे. तसेच समितीची मंजुरी सन २००४ मध्ये घेण्यात आली आहे. हे वाटप गटपातळीवर (ब्लॉक लेव्हलला) केले जाते. त्यामुळे लाभार्थ्यांच्या प्रमाणात वाटप झालेले आहे. ज्यांच्याकडून दर निश्चित केलेला होता, त्यांच्याकडून वाटप पूर्ण करण्यात आले आहे. तसेच गट विकास अधिकारी यांना पुरविण्यात आलेली अवजारे सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र पोहोच पावतीसह दिलेले आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

कृषी समितीची मान्यता न घेता लाभार्थींची यादी निश्चित न करता व कडबाकुट्टी यंत्रे खरेदीसाठी रु.४,९९,१००/- एवढा खर्च केल्या संदर्भात लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहिती वरुन असे दिसून येते की, कडबाकुट्टी यंत्रे खरेदी बाबत, खुलासा करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले असता, त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, याकरिता समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. तथापि, मान्यता नंतर घेण्यात आली असल्याचे दिसून येते.

समितीने सदर योजनेच्या संदर्भात घेतलेल्या माहिती वरुन असे दिसून आले की, कडबाकुट्टी यंत्रे खरेदी करण्यापूर्वी लाभार्थींची निवड होणे आवश्यक असल्याचे समितीने आपले मत व्यक्त केले. कडबाकुट्टी यंत्राच्या लाभार्थींच्या यादीस कार्योत्तर म्हणजे दि.२ जून, २००६ रोजी मान्यता घेतली. **सबब, यासंदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी लाभार्थींची यादी निश्चित न करता यंत्रे खरेदी केली त्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी व यापुढे असे घडू नये याची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा परिषदेना कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन - एक

कोल्हापूर, जिल्हा परिषद

मंजूर अनुदान ठेव सदरी ठेवले बाबत. (परिच्छेद क्रमांक ३.१३)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक ८६) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी मंजूर अनुदान ठेव सदरी ठेवले बाबत यावर लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत :

पंचायत समिती, भुदरगडने सन २००४-२००५ मध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत मंजूर अनुदान रक्कम रुपये ३४,६६,३१४ अंतिम लेखाशीर्षाखाली खर्च घालून ठेव सदरी ठेवलेले आहे. शासन अनुदानाच्या रक्कमा ठेव सदरी ठेवण्यात येऊ नयेत असे शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील वरील अनियमितता झालेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. सदर रक्कमा ग्रामपंचायतींना अदा केल्यानंतर विहित नमुन्यातील नमुना नंबर ७ मधील पोहोच घेऊन खात्री पटविणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालील प्रमाणे खुलासा करण्यात आला :

सन २००३-२००४ या वर्षात भुदरगड तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींनी यशवंत ग्रामसमृद्धी योजनेत लोकवर्गणी भरुन भाग घेतला होता. या २२ ग्रामपंचायतींना तिसरा हप्ता रक्कम रु.३१.५५ लाख दिनांक ३१/३/२००५ रोजी प्राप्त झाले. सदर रक्कमा गट विकास अधिकारी यांचे नावे उघडणेत आलेल्या यशवंत ग्रामसमृद्धी खाते क्रमांक (१२४५१) मध्ये ठेवायचे होते. तथापी वर्ष अखेरचे कामाचे गडबडीत सदर रक्कम ठेव सदरी जमा केली गेली.

मात्र सदर रकमा २२ ग्रामपंचायतींना अदा केले बाबत नमुना नं.७ च्या पावत्या प्राप्त आहेत. रक्कमेचा योग्य विनियोग झालेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर यांची दिनांक ७ सप्टेंबर, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांने पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्र.३.१३ संबंधातील विभागाने केलेले स्पष्टीकरण आणि केलेली कार्यवाही व रकान्यात झालेली टंकलेखनाची चूक झाली असल्याने दुरुस्त करण्यासाठी अनुमती मिळावी, अशी विनंती केली त्यावर समितीने दुरुस्ती करण्यासाठी अनुमती दिली व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अहवालात रुपये ३१.५५ लाख दिनांक ३१/३/२००५ रोजी प्राप्त झाले" असे नमूद केले आहे. तथापि, प्रत्याक्षात रुपये ३३,५५,००१ दिनांक ३१/३/२००५ रोजी प्राप्त झाले व पूर्वीची रक्कम रुपये २,११,३१३ अशी एकूण रक्कम रुपये ३५,६६,३१४/- ठेव सदरी ठेवली असल्याचे सांगितले.

शासन अनुदानाच्या रकमा ठेव सदरी ठेवण्यात येऊ नयेत, असे शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील, यात अनियमितता झालेली असून सुद्धा ती आपण मान्य करीत नाहीत, असे समितीने विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, सदर निधी ठेव म्हणून ठेवण्यात येत नाही. सन २००३-२००४ मध्ये भूदरगड तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींना यशवंत ग्रामसमृद्धी योजना मंजूर झाली होती. त्याप्रमाणे सदर ग्रामपंचायतींनी, यशवंत ग्रामसमृद्धी योजनेत, लोकवर्गणी भरुन भाग घेतला होता. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेला ३१ मार्च, २००४ मध्ये काही निधी उपलब्ध झाला. सर्व कामे शेवटच्या टप्प्यामध्ये होती. निधी परत जावू नये म्हणून बँक ऑफ इंडियामध्ये ठेव सदरामध्ये निधी ठेवला होता. यात अनियमितता झाली आहे काय, असे समितीने पुन्हा विचारले असता, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सांगितली की, यात नियमांचे उल्लंघन झाले आहे.

या संबंधी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा खुलासा मागविण्यात आला आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, सदर प्रकरण हे पंचायत स्तरावरील आहे. त्यामुळे त्यांचा खुलासा मागविला असल्याचे मुख्य कार्यकरी अधिकाऱ्यांनी सांगितले. समितीने पुन्हा विचारणा केली की, यशवंत ग्रामसमृद्धी योजनेचे खाते, जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखाली असते. त्यावर मुख्य लेखा अधिकाऱ्यांनी होय असे सांगितले असता, समितीने पंचायत समितीचा संबंध कुठे आला, त्यावर सांगण्यात आले की, जिल्हा परिषदेकडे निधी येतो. सदरचा निधी पंचायत समितीकडे वर्ग करण्यात येतो व पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायतीकडे निधी वर्ग करण्यात येतो असे स्पष्टीकरण मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिले.

मुख्य लेखा अधिकाऱ्यांनी भूदरगड पंचायत समितीला भेट दिली, भेटीमध्ये पंचायत समिताला कोणते मार्गदर्शन केले, पंचायत समिती, भूदरगडने सन २००४-२००५ मध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजने अंतर्गत मंजूर अनुदान रक्कम रुपये ३४,६६,३१४ अंतिम लेखा शीर्षाखाली खर्च घालून ठेव सदरी ठेवले आहे, त्यास लेखा परीक्षकांचा आक्षेप आहे काय, असे समितीने विचारले असता, सांगण्यात आले की, शासनाकडून अनुदान उशिराने आलेले आहे. मार्च अखेर निधी प्राप्त झाला असल्याचे सांगितले. समितीसमोर लेखा परिक्षकांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेनी पंचायत समित्यांकडे निधी दिल्यानंतर, गटविकास अधिकाऱ्यांनी तो निधी पंचायत समितीकडे द्यायला हवा होता परंतु त्यांनी तसे न करता ठेव खात्यात जमा केला आहे. काम झाले नसेल किंवा त्यांनी पुढील वर्षात ही रक्कम खर्च करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल आणि नेमके तेच टाळण्याच्या दृष्टीने हा खर्च करण्यासाठी दाखवून ठेव खात्यात ती रक्कम जमा केली आहे व पुढील वर्षात ती खर्च केली.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत ग्रामविकास विभागाकडून माहिती मागविली :

१. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत प्राप्त होणारे अनुदान हे त्याच वर्षात खर्च न झाल्यास सदर अनुदानाच्या रक्कमेसंदर्भात कोणती कार्यपद्धती अवलंबण्यात येते याबाबत खुलासा करण्यात यावा ?

याबाबत ग्रामविकास विभागाने पुरविलेल्या महितीत असे नमूद केले आहे की,

१. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत प्राप्त होणारे अनुदान त्याच वर्षात खर्च न झाल्यास सदर अनुदान रक्कमे संदर्भात सदर रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्चास मुदवाढ घेणे आवश्यक आहे.

अ) क्रमांक/य.ग्रा.वि./२००४/प्रक्र.७०४/परा ६ (४७) ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. १५ जून, २००४ ने सन २००३-२००४ मध्ये अखर्चीत शिल्लक रक्कमा खर्च करणे संदर्भात विशेष बाब म्हणून पुढील आर्थिक वर्षात सन २००४-२००५ मध्ये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ब) क्रमांक/य.ग्रा.वि./२००५/प्रक्र.१०६७/परा ६ (४७) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. ११ ऑक्टोबर, २००५ ने सन २००४-२००५ या वर्षातील प्राप्त अनुदान शिल्लक अखर्चीत रक्कम सन २००५-२००६ मध्ये पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सचिवांची साक्ष :

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने १३ जुलै, २०११ रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, यशवंत ग्रामसमृद्धी योजने अंतर्गत प्राप्त होणारे अनुदान हे त्याच वर्षात खर्च न झाल्यास सदर अनुदानाच्या रक्कमे संदर्भात कोणती कार्यपद्धती अवलंबण्यात येते, याबाबत सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सांगितले की, यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत अनुदान देण्यासाठी प्रथम संबंधित ग्रामपंचायतींनी १५ टक्के लोकवर्गणी जमा करावी लागते. ती रक्कम जर जमा केली गेली नाही तर, या योजनेंतर्गत निधी देता येत नाही. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत प्राप्त होणारे अनुदान त्याच वर्षात खर्च न झाल्यास अनुदानाच्या रक्कमेस पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यास शासनाकडून मुदतवाढ घ्यावी लागते.

ग्रामपंचायतींनी लोकवर्गणी भरल्यानंतर, दि. ३१ मार्च, २००५ रोजी म्हणजे शेवटच्या दिवशी शासनाचा निधी उपलब्ध होणे ही अनियमितता आहे. तसेच, हे अनुदान परत जाऊ नये, यासाठी सदरची रक्कम "अनामत ठेव" सदरी जमा केली आहे. त्यामुळे नियमांचा भंग झालेला आहे, असे समितीने आपले मत व्यक्त केले असता, त्यावर सचिवांनी समितीस विदित केले की, सदरचे अनुदान यशवंत ग्रामसमृद्धी खात्यामध्ये ठेवण्याऐवजी वर्षा अखेरच्या कामाच्या गडबडीत ठेव सदरी जमा केली गेल्याचे गटविकास अधिकाऱ्यांनी मान्य केले. जर सामान्य कारकुनाने चूक केली असती तर ती समजता येईल. परंतु, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याने चूक केली आहे असे समितीने आपले मत व्यक्त केले असता, त्यावर विभागाने खुलासा केला की, यामध्ये तांत्रिक चूक झालेली आहे. वास्तविक पहाता ही दोन्ही खाती पंचायत समितीचीच आहेत. शेवटच्या दिवशी अनुदान प्राप्त झाल्याने, वर्ष अखेरच्या कामांच्या गडबडीत सदरची रक्कम ठेव सदरी जमा केली होती. नंतर ती रक्कम यशवंत ग्रामसमृद्धी योजनेच्या खात्यामध्ये जमा करण्यात येऊन तिचे वाटप देखील करण्यात आले आहे.

समितीने पुढे अशी विचारणी केली की, ज्या अधिकाऱ्यांनी ही चूक केली त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, वर्ष अखेरच्या कामाच्या गडबडीत ही चूक घडलेली आहे. याबाबत त्या गटविकास अधिकाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचा खुलासा मागविण्यात आला होता. गट

विकास अधिकाऱ्यांनी केलेल्या खुलाशामध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजनेचे अनुदान दि.३१/३/२००५ रोजी प्राप्त झाले व ते परत जाऊ नये म्हणून अनामत ठेव सदरी जमा केली आहे व पुढील आर्थिक वर्षात रक्कम खर्च केली असल्याचे सांगितले. तसेच, या योजनेतील काम देखील पूर्ण झाले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जर ग्रामपंचायतीने आपला हिस्सा लोकवर्गणीच्या रुपाने जमा केला नाही तर ही योजना राबविता येत नाही. परंतु, ग्रामपंचायतींनी आपला हिस्सा जमा केल्यानंतर देखील शेवटच्या दिवशी अनुदान मिळणे कितपत योग्य आहे. याबाबत वित्त विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा करुन हा निधी, वेळेवर मिळण्याबाबत प्रयत्न होणे गरजेचे होते. यावर सचिवांनी समिती समोर असे मत व्यक्त केले की, ही राज्य शासनाची योजना असून त्यामध्ये राज्य शासनाचा वाटा ८५ टक्के इतका आहे. या योजनेला एवढा प्रचंड प्रतिसाद मिळाला की, शेवटी सन २००६ मध्ये लोक वर्गणी काढू नये असा शासन निर्णय काढावा लागला. त्या अगोदर प्राप्त झालेल्या लोकवर्गणीनुसार जिल्हानिहाय निधीचे वाटप जवळपास तीन वर्षे करण्यात येत होते. सद्यःस्थितीमध्ये ही योजना बंद झाली असून लोकवर्गणीचे प्रमाण आता १५ टक्क्यांऐवजी २५ टक्के इतके करण्याचा शासनाचा विचार असल्याचे सांगण्यात आले.

अभिप्राय व शिफारशी :

कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत, भूदरगड पंचायत समितीस सन २००४-२००५ या वर्षाकरिता यशवंत ग्रामसमृद्धी योजनेतंर्गत, मंजूर अनुदान रक्कम रु.३४,६६,३१४/-अंतिम लेखा शिर्षाखाली खर्च घालून ठेव सदरी ठेवलेले आहे. अनुदानाच्या रक्कमा ठेव सदरी ठेवण्यात येऊ नयेत असे शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील वरील अनियमितता झालेली आहे या बाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात, जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, ग्रामपंचायतींनी लोकवर्गणी भरल्यानंतर दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी म्हणजे शेवटच्या दिवशी शासनाचा निधी उपलब्ध होणे व अनामत रक्कम ठेव सदरी जमा होणे यात अनियमितता झाली आहे.

सदरचे अनुदान यशवंत ग्रामसमृद्धी खात्यामध्ये ठेवण्या ऐवजी वर्षा अखेरच्या कामाच्या गडबडीत ठेव सदरी जमा केले गेल्याचे गट विकास अधिकाऱ्यांनी मान्य केले. वर्ष अखेरच्या कामाच्या गडबडीत संबंधितांकडून सदरची चूक घडलेली आहे. तथापि, त्याबाबत त्यांचा खुलासा मागविण्यात आलेला असून सदरची रक्कम यशवंत ग्रामसमृद्धी योजनेच्या खात्यात जमा तसेच वाटपही केल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

समितीच्या मते लोकवर्गणी जमा झालेली असतांनाही अनुदान विहित वेळेत प्राप्त न होणे उचित नाही. त्यामुळे वित्त विभागाच्या सचिवांसमवेत चर्चा करुन निधी वेळेत मिळण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सबब, **समिती शिफारस करते की, शासनाने यशवंत ग्रामसमृद्धी योजनाच नव्हे तर ग्रामविकासाशी संबंधीत इतरही योजनांचा निधी विहित कालावधीत संबंधीत विभाग वा क्षेत्रिय स्तरावर उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन अशा योजनांच्या प्रगतीस निधी उपलब्ध असतांनाही केवळ नियोजनाअभावी खीळ बसू नये. त्याचप्रमाणे सचिव, ग्रामविकास विभाग यांनीही सचिव, वित्त विभाग यांच्यासमवेत वेळोवळी चर्चा व पाठपुरावा करुन निधी उपलब्ध करुन द्यावा.**

यशवंत ग्रामसमृद्धी योजना ही राज्य शासनाची योजना असून या योजनेतंर्गत लोकवर्गणीतून ग्रामपंचायतीचा वाटा १५ टक्के व शासनाचा वाटा ८५ टक्के इतका आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणावर प्रतिसात मिळाला तरीही शासनाने सदरची योजना सन २००६ मध्ये बंद केली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. लोकवर्गणीचा वाटा १५ टक्क्यांऐवजी २५ टक्के करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे समितीस अवगत करण्यात आले.

समितीच्या मते, शासनाच्या अनेक लोकोपयोगी योजना निधी, नियोजन अथवा अंमलबजावणी अशा एक वा अनेक कारणांमुळे बऱ्याच प्रमाणात अपयशी ठरत आहेत. उलटपक्षी यशवंत ग्रामसमृद्धी योजनेस मिळणारा प्रतिसाद तुलनात्मकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर असून सदर योजनेतून ग्रामिण भागातील विकासास चालना मिळत आहे.

सबब, **समिती शिफारस करते की, सदर योजनेतील लोकवर्गणीचा वाटा २५ टक्के व शासनाचा वाटा ७५ टक्के एवढा करण्यात येवून ही लोकोपयोगी योजना पुन्हा राबविण्यात यावी. समिती अशीही शिफारस करते की, उक्त शिफारशीबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस अवगत करण्यात यावी.**

प्रकरण तीन - दोन

कोल्हापूर, जिल्हा परिषद

कानडेवाडी, (ता. गडहिंग्लज) येथील पाझर तलाव बांधकामाबाबत (परिच्छेद क्र. ३.२०६)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पूनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.५१) जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत कानडेवाडी, तालुका गडहिंग्लज पाझर तलाव बांधकामावर रक्कम रुपये १७,७२,७३२/- खर्च केलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक उपलब्ध न झाल्यामुळे नमुद केलेले परिमाण व त्यासाठी दिलेले दर योग्य असलेबाबत खात्री करता येत नाही याबाबत साधार खुलासा करावा.

२. कामाच्या अनामत रक्कमेच्या तीन टक्के रक्कम रुपये १,८०५ चा मुद्रांक करारनामा करणे आवश्यक असताना रुपये १० चा मुद्रांक वापरला आहे. तरी कमी वापरलेली मुद्रांकाची रक्कम रुपये १,७९५ संबंधितांकडून वसुल करावी. त्याचप्रमाणे या कामामधील उर्वरित कामाची रक्कम रुपये ४,९२,४३८ आहे. त्यासाठी करारनामा रुपये ७४० च्या मुद्रांकावर करण्याऐवजी रुपये ३० च्या मुद्रांकावर केल्याने रुपये ७२० संबंधितांकडून वसुल करावेत.

३. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक पंरास/१०८८/सी आर/३०४१/२६, दिनांक १४ सप्टेंबर, १९९८ व लेखासंहिता, नियम ८७ अन्वये जमीन संपादन केल्याशिवाय योजनेचे काम हाती घेऊ नये असे स्पष्ट आदेश असताना जमीन संपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नसताना योजनेचे काम हाती घेऊन योजनेवर खर्च कोणत्या आधारे केला याचा खुलासा करावा. योजनेचे काम दिर्घकाळ अपूर्ण राहिल्याने व परिणामी ११८.९० टक्के प्रमाणे जादा दर मंजुर करुन कामाचा मक्ता दिलेने मूळ मोजमाप पुस्तिका क्रमांक

११७ ची तपासणी करता पृष्ठ क्रमांक ३१ हंर्टीगचे परिमाणातून ५% सिंकेज वजा करणे आवश्यक असताना २% वजा केली आहे सिंकेज कमी केल्यामुळे रुपये ९८५२ जादा अदा झाली आहेत. सदर जादा रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात यावी.

४. वरीलप्रमाणे पृष्ठ क्रमांक ३६ वर केसिंगच्या परिमाणातही रक्कम रुपये ११,१४१.९८+१५ टक्के जादा निविदा दर अशी एकूण रुपये १२,८१३ जादा अदा झाली आहे. सदर जादा रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात यावी.

५. उर्वरित कामाचा मक्ता रुपये ११८.९० टक्के जादा दराने दिला आहे. कामाची मोजमाप नोंदवही क्र.२७९९ पृष्ठ क्र.५८ बाब क्रमांक ७ अन्वये हर्टिंगचे परिमाण ६,६४५.९८ घनमीटर आहे. सदर परिमाणातून ५% सिंकेज घट वजा करणे ऐवजी २% वजा केली आहे. त्यामुळे रक्कम रुपये १०,९५१ जादा अदा झाली आहे. जादा अदा रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात यावी व मोजमाप नोंदवही क्र.२७९९ पृष्ठ क्रमांक ६५, बाब क्रमांक ८ अन्वये केसिंगचे परिमाण ११६२४.०४ घनमीटर मधून २% सिंकेज २३२.४८ घनमीटर वजा केला आहे. एकूण परिमाणातून ५% सिंकेज ५८१.२० घनमीटर करणे आवश्यक असता दोन टक्के वजा केल्याने कमी वजा केलेल्या ३४८.७२ घनमीटरची प्रती घनमीटर रुपये २६.९० प्रमाणे रक्कम रुपये ९,३९०.६२ + जादा निविदा दर ११८.८० टक्के अशी एकूण रुपये २०,५३४ जादा अदा झाली आहे. सदर जादा अदा रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात यावी.

६. कामाची सुधारित प्रशासकीय मंजूरी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही, सदर बाबत खुलासा करुन पुर्तता दाखवावी.

७. महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक ग्रा.पा.क्र.१०९७/प्र.क्र.१०/पाफ-०७, दिनांक ११ डिसेंबर, १९९७ अन्वये वापरलेल्या साहित्याचा मान्यता प्राप्त संस्थेकडील चाचणी तपासणी अहवाल घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही का केली नाही याचा खुलासा करावा व वापरलेली माती, मुरुम योग्य दर्जाचे असल्याबाबत साधार खात्री पटवावी.

८. उप अभियंता, भुदरगड यांचे पत्राचे अवलोकन केले असता मक्तेदाराने खुदाईमधून निघालेल्या ९०% साहित्याचा परस्पर खाजगी कामासाठी वापर केलेला आहे. जागेवर दगड उपलब्ध असताना बाहेरुन दगड आणुन पिचींगसाठी दगड वापरलेचे दाखवून प्रति घनमीटर (१०.२.१५-३.४५) रुपये ७१.७० प्रमाणे १,०८९.४२ घनमीटर पिचींग कामाची रक्कम रुपये ७८,१११.४१+ जादा निविदा दर ११८.९० टक्के अशी एकूण रुपये १,७०,९८६ संबंधित मक्तेदार यांचेकडून वसूल करुन दाखवावी.

९. सदर कामासाठी बाहेरुन १,०८९.४२ घनमीटर दगड आणून पिचींगसाठी वापरलेला आहे. सदर परिमाणाची महसुल व वनविभाग, शासन निर्णय, क्रमांक गौरवर्णी १०८८/४३३/३५९२/ख, दिनांक १८ ऑक्टोबर, २००१ अन्वये स्वमित्वधन प्रति घनमीटर प्रमाणे होणारी रक्कम रुपये १९,२२८ संबंधितांकडून जमा करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१. या विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखापरिक्षण कालावधीमध्ये सुरु होते त्यामुळे सदर अंदाजपत्रकाची नस्ती आढळलेले नव्हती. आता सदर कामाचे मूळ अंदाजपत्रकाची नस्ती प्राप्त असून ती लेखापरिक्षणास उपलब्ध आहे.

२. कमी वापरलेली मुद्रांकाची रक्कम रु.२५१५/- संबंधिताकडून वसूल करुन शासनास भरणा केलेली आहे. भरणा चलन दप्तरी ठेवले आहे.

३. काम सुरु करणेपूर्वी संबंधित जमीन धारकांची संमत्ती घेवून काम सुरु करणेत आले होते. भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणेत आल्यानंतर त्यानुसार भूसंपादन खात्यामार्फत ८० टक्के रक्कम संबंधित जमीनधारकाना अदा करणेत आली. त्यानंतर बुडीत क्षेत्रातील घरांची संमत्ती पत्रे वेळाने म्हण्जे दि.२४/४/१९९७ ला प्राप्त करुन घेतली यामध्ये बराच कालावधी गेल्याने मूळ मक्तेदाराने काम करणेस नकार दिला त्यामुळे मूळ मक्ता १५ अ खाली रद्द करणेत आला.

सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन १/२/१९९९ रोजी जाहीर निविदा प्रसिद्ध केली त्यानुसार सर्वात कमी दराची ११८.९०% जादा दराची निविदा प्राप्त झाली. सदरच्या जादा दराची सन १९९८/९९ च्या दरसुचीशी तुलना करता वाढीव दर ४.९८% इतका येतो.

इरिगेशन मॅन्युअल मधील पृष्ठ क्र.१०९ वरील पॉईंट क्र.८.७.३-(b) नुसार २% कपात केली आहे. त्यामुळे हर्टिंगचे परिमाणात जादा आदाई झालेली नाही.

४. इरिगेशन मॅन्युअल मधील पृष्ट क्र. १०९ वरील पॉईंट क्र. ८.७.३-(b) नुसार २% कपात केली आहे. त्यामुळे केसिंगचे परिमाणात जादा आदाई झालेली नाही.

५. इरिगेशन मॅन्युअल मधील पृष्ठ क्र.१०९ वरील पॉईंट क्र. ८.७.३-(b) नुसार २% कपात केली आहे. त्यामुळे जादा आदाई झालेली नाही.

६. सदर कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली असून लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

७. सदर काम सत्वर पूर्ण करणेकामी स्थानिक ग्रामस्थांना त्यांच्या शेतीसाठी पाझर तलावातील पाण्याचा लाभ होणे कामी तगादा सुरु होता त्यामुळे चाचणी अहवाल न घेता सदरचे काम पूर्ण केले आहे. तथापी तलावासाठी वापरलेल्या माती व मुरुमाची आता तपासणी करुन घेवून चाचणी अहवाल दप्तरी ठेवलेला आहे व ती योग्य दर्जाची असून त्यामध्ये पाणी साठा होत आहे व त्याचा वापर होत आहे.

८. खुदाईमधून निघालेले साहित्य कार्यकारी अभियंता यांचे कामाचे भेटीवरुन दिलेल्या निरिक्षण टिपणीनुसार निघालेले साहित्य वापरणेस अयोग्य असलेने त्याचा वापर अन्य कामावर होवू शकत नाही असे नमूद आहे. यास्तव कार्यकारी अभियंता यांचे सूचनेवरुन बाहेरील दगड वापरलेला आहे. त्यामुळे केलेले काम योग्य आहे.

९. स्वामित्वधन कपात करुन घेणेबाबत शासन निर्णय दिनांक १८ ऑक्टोबर, २००१ अन्वये सुचना प्राप्त आहेत. कामाचा आदेश तत्पूर्वी दिनांक २७/१०/१९९९ रोजी देणेत आलेला असून अंदाजपत्रकीय दरामध्ये स्वामित्वधन रक्कमेचा अंतर्भाव करणेत आलेला नाही. तथापी स्वामित्वधनाची रक्कम रु.१९,२२८/- पुरवठादार यांनी शासनास भरणा केलेली असून सोबत भरणा केलेल्या रकमेची पावती जोडण्यात आलेली आहे.

तरी वरील खुलासा अवलोकनी येणे विषयी विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

जिल्हा परिषद कोल्हापूरकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने जिल्हा परिषद, कोल्हापूरला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ सप्टेंबर, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, रु.२५१५/- एवढ्या किंमतीचे मुद्रांक किती वापरले ही जबाबदारी कोणाची आहे, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, कार्यकारी अभियंता (ल.पा.) यांची ही जबाबदारी होती. नियमानुसार किती मुद्रांक वापरायला पहिजे होते, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागाने ही चूक झाली असल्याचे मान्य केले. ज्यांनी ही चूक केली त्यांच्यावर काय कारवाई केली, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.जोशी हे जबाबदार आहेत. समितीने पुढे अशी विचारणी केली की, अंदाजपत्रकाची मूळ नस्ती सादर केली नाही त्याला जबाबदार कोण त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही जबाबदारी खाते प्रमुखांची आहे.

या कामाला मुख्यतः दोन वेळा प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. मूळ अंदाजपत्रक मिळाले नाही म्हणून समितीची दिशाभूल करण्यात येत आहे असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे दोन्ही सुधारित अंदाजपत्रके आता उपलब्ध आहेत. समितीने पुन्हा विचारणा केली की, सुधारित प्रशासकीय मान्यता किती तारखेला दिली आहे, या कामाची सन १९९८-९९ च्या दर सूचीबरोबर तूलना करुन सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता कशी दिली, त्यावर असे सांगण्यात आले की, हे काम सन १९९७-९९ या काळातील असून दिनांक २६.२.१९९२ रोजी मुळ प्रशासकिय मान्यता देण्यात आली व दि.२९/८/२००१ रोजी सुधारित मान्यता दिलेली आहे. या ठिकाणी सुरुवातीला सन १९९१ मध्ये पाझर तलावाचे काम घेतले होते. तेव्हा रु.१३,९७,२९३/- एवढ्या रक्कमेचे या कामाचे अंदाजपत्रक होते. त्यातून रु.७,९८,४५०/- इतक्या रक्कमेचे काम झाले. नंतर मात्र भूसंपादनाची अडचण निर्माण झाली म्हणून हे काम रद्द करण्यात आले. पुन्हा सन २००१ मध्ये याच कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता घेतली आणि ती निविदा रु.४,९२,४३८/- एवढ्या रक्कमेची काढण्यात आली होती.

या कामाची प्रशासकीय मान्यता सन २००१ ची असली तरी रु.४.९८ टक्के इतक्या वाढीव दराने सन १९९८-९९ ची दरसूची आपण मान्य कशी केली, सुधारित प्रशासकीय मान्यता नसताना ही निविदा मान्य करण्यात आल्या काय, त्यावर कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सन १९९८-१९९९ च्या डिएसआर प्रमाणे हे दर असल्याचे

सांगण्यात आले. एखाद्या कामाला प्रशासकीय मान्यता देणे वेगळे आणि त्याच नावाने प्रसिद्ध केलेली निविदा स्वीकारणे या दोन्ही बाबी भिन्न भिन्न आहेत. असे समितीने मत व्यक्त करुन पुढे अशी विचारणा केली की, अशा प्रकारे प्रश्नापासून दूर जाण्याचा प्रयत्न करु नये, प्रश्नाला सरळ सरळ उत्तर द्यावे, असे समितीने निर्देश दिले असता त्यावर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी खुलासा केला की, त्यावेळेस सन १९९८-१९९९ चे दर होते म्हणून ४.९८ टक्केशी तुलना केली आहे.

समितीने पुन्हा विचारणा केली की, त्यावेळेस या पाझर तलावाची किंमत किती होती, त्यावर सांगण्यात आले की, सुरुवातीला रु.१३,९७,२९३/- एवढी अंदाजपत्रकीय तरतूद आणि एकूण योजनेवरील खर्च रु.७,७२,७३२/- एवढा झाला आणि त्यापूर्वी ७.९८ लाख एवढा खर्च झालेला आहे. त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, या कामाचे पूर्तता प्रमाणपत्र मिळाले आहे काय, या प्रकरणामध्ये बरीच अनियमितता झालेली आहे. त्यात कागदपत्रे सापडत नाहीत, जमीन नसताना काम केले तसेच हे पाहण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्यांची होती. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, जमीन देण्याबाबत या भागातील लोकांनी संमती दिली होती परंतु नंतर चार लोकांनीच त्यासाठी हरकत घेतली होती. कारण त्यांची घरे बुडित क्षेत्रात येत असल्याची त्यांची तक्रारी होती. समितीने तोंडी संमती घेणे आणि भूसंपादन प्रक्रिया या दोन्ही बाबी वेगवेगळ्या होत्या असे मत व्यक्त केले असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वास्तविक जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु झाल्यापासून जवळ-जवळ ८० टक्के मोबदल्याची रक्कम जमीन मालकांना दिली होती. हे जरी खरे असले तरी, भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली नसताना सर्व गोष्टी करण्याची काय गरज होती, तसेच भूसंपादन अधिनियम, कलम ४ ची अधिसूचना जाहीर झाली होती काय, अशी समितीने विचरणा केली असता त्यावर कलम ४ ची अधिसूचना जाहीर केली असल्याचे सांगण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सेक्शन ४ ची नोटीस लागू झाली होती काय, अशा प्रकल्पांना तांत्रिक मान्यता देताना पाणलोट क्षेत्रामध्ये जेवढी घरे, झाडे, विहिरी येत असतील त्या सर्वांचे मोजमाप करुन, भूसंपादनाचा प्रस्ताव मान्य करुन आणि भूसंपादनाचा मोबदला देऊन जमीन ताब्यात घेतली जाते. या प्रकरणी सर्व प्रक्रिया उलट झालेली आहे, प्रशासकीय अनियमितता झालेली आहे. सेक्शन ४ ची नोटीस किती तारखेला काढली, तसेच जागा किती तारखेला ताब्यात घेतली, त्यावर विभागाने कोणतेही उत्तर दिले नाही. तरीही समितीने या संपूर्ण कामामध्ये अनियमितता झालेली आहे काय, आशी पुन्हा विचारणा केली असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासन निर्णयाप्रमाणे जो पर्यंत भूसंपादन होत नाही तोपर्यंत काम सुरु करता येत नाही असे मत व्यक्त केले असता त्यावर समितीने कामामध्ये अनियमितता झालेली आहे काय, त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरच्या कामामध्ये अनियमितता झालेली असल्याचे सांगितले. समितीने या अनियमिततेला कोण जबाबदार आहे आणि त्यांच्यावर कोणती कारवाई करणार याची माहिती समितीला दिनांक ९/९/२०१० रोजीच्या बैठकीत द्यावी असे निर्देश देवून समितीने खुदाईतील दगड वापरण्यास अयोग्य असल्याबाबत मान्यता प्राप्त संस्थेकडून प्रमाणपत्र का घेण्यात आले नाही, अशी समितीने पृच्छा केली असता त्यावर कार्यकारी अभियता (बांधकाम) यांनी स्वामित्वधनाचा प्रश्न

नव्हता, असा खुलासा केला असता, त्यावर समितीने स्वामित्वधनाचा प्रश्न, दगडाचा प्रश्न, माती-मुरुमाचा प्रश्न इतके प्रश्न या कामाच्या अनुषंगाने निर्माण झालेले आहेत. याचा अर्थ हे काम बोगस झाले असल्याचे समितीने आपले मत व्यक्त केले असता, त्यावर भूसंपादनाच्या बाबतीत अनियमितता झालेली आहे ही वस्तुस्थिती कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांनी मान्य केली.

या कामावार किती माती आणि मुरुम वापरलेला आहे याची समिती पाहणी करील. एका प्रकल्पाच्या कामाची माहिती घेण्यासाठी इतका वेळ लागत असेल तर जिल्ह्यातील पाझर तलावांची माहिती घेण्यासाठी किती वेळ लागेल, त्यावर असे सांगण्यात आले की, अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखा परिक्षण कालावधीमध्ये सुरु होते. त्यावेळी अभिलेख उपलब्ध झाले नाहीत वरील कालावधीचे खर्चाची रक्कम कशाप्रकारे अदा करण्यात आली, अशी विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, कामाची देयके त्या त्या वेळी दिलेली आहेत.

कामाचे मूळ अंदाजपत्रक उपलब्ध न झाल्यामुळे नमूद केलेले परिमाण व त्यासाठी दिलेले दर योग्य असल्याबाबत खात्री करता येत नाही. योजनेचे काम दीर्घकाळ अपूर्ण राहिले असल्यामुळे ११८.९० टक्के प्रमाणे जादा दर मंजूर करुन कामाचा मक्ता दिल्याने, जादा रक्कम अदा केलेली आहे. ही रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात यावी असा गंभीर शेरा परिच्छेदामध्ये आहे. जेव्हा समिती सचिवांची साक्ष घेईल त्यावेळी सचिव संबंधिताना सोडतील काय, या संदर्भात केलेले काम योग्य आहे अशा प्रकारचा खुलासा केलेला आहे. हा खुलासा योग्य आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, २००१ पूर्वीचे हे काम आहे. २००१ पूर्वी स्वामीत्वधनाची तरतूद नव्हती. तत्कालीन कार्यकारी अभियंता बैठकीला उपस्थित राहिलेले आहेत काय, असे समितीने विचारले असता त्यावर तत्कालीन कार्यकारी अभियता (बांधकाम) यांनी होय असे सांगून हे काम माझ्या कार्यकाळात पूर्ण झालेले नाही. तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी या ठिकाणी ३ वर्षे ८ महिने कार्यरत असल्याचे नमूद केले. १९९७ मध्ये या कामाची परिस्थिती काय होती, अशी समितीने विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, घळ भरणी बाकी होती, दगड लावण्याचे काम बाकी होते. त्यावेळी अकुशल काम कोणत्या योजनेतून घेण्यात आले होते, कुशल आणि अकुशल कामाची रक्कम वेगळ्या योजनेतून अदा करण्यात आली काय, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागाने उत्तर देण्याचे टाळले.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने सामितीने खालील मुद्यासंदर्भात अधिक माहिती मागविली.

१. कानडेवाडी येथील पाझर तलावाच्या बांधकामासंदर्भातील कागदपत्राच्या पडताळणीच्यावेळी लेखापरिक्षकांना अंदजपत्रकाची मूळ नस्ती सादर न केल्यामुळे नमूद केलेले परिमाण व त्यासाठी दिलेले दर योग्य असल्याबाबतची खात्री करता आली नाही. तसेच, काम दिर्घकाळ चालल्याने जादा दराने रक्कम देवून पूर्ण करण्यात आले यास जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

२. सदर कामास दोन वेळा प्रशासकिय मान्यता देण्यात आली व दोन वेळा निविदा काढण्यात आल्या तसेच जमीन संपादनाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण न होताच कामास सुरवात करणे इत्यादी अनियमितता झाल्या आहेत

यास जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली:-

१. (अ) या विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखापरिक्षण कालावधीमध्ये (२००५-२००६) सुरु होते. यामुळे लेखा परिक्षकांना अंदाजपत्रकाची नस्ती दाखविता आली नाही. आता सदर कामाचे मूळ अंदाजपत्रकाची नस्ती उपलब्ध आहे.

(ब) कानडेवाडी, ता.गडहिंग्लज येथे पाझर तलाव बांधणे या कामास तांत्रिक मंजूरी दि.१४/१०/१९९१ व प्रशासकीय मंजूरी जिल्हा परिषद ठराव क्र.२१३, दि.२६/०२/१९९२ अन्वये देण्यात आली.

सदर कामास शेतकऱ्यांची संमतीपत्रे घेवून दि.०९/०२/१९९३ रोजी कामास सुरुवात केली. भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणेत आल्यानंतर त्यानुसार भूसंपादन खात्यामार्फत ८०% रक्कम संबंधीत जमीन धारकांना अदा करणेत आली. बुडीत क्षेत्रातील घरांची संमतीपत्रे दि.२४/०४/१९९७ ला मिळाली. बुडीत क्षेत्रातील संमतीपत्रे उशीरा मिळाल्याने मूळ मक्तेदाराने काम करण्यास नकार दिला. ठेकेदाराने मूळ मुदत दि.०८/०८/१९९५ पर्यंत रु.७.९८ लक्ष इतके काम केले होते.

(क) मूळ अंदाजपत्रकातील उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास अधीक्षक अभियंता यांना तांत्रिक छाननी करुन तांत्रिक मंजूरी सन २००१-२००२ अन्वये दिलेली आहे.

(ड) सुधारित अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मंजूरी जिल्हा परिषद ठराव क्र.७३६, दि.२९/११/२००१ अन्वये देण्यात आली.

मूळ अंदाजपत्रक रकमेपेक्षा जादा खर्च हा दरसूचीमध्ये झालेली दरवाढ, वाहन अंतर, ईटपी चार्जेस व भूसंपादन बाबी इत्यादीमूळे झालेला आहे. त्यास जिल्हा परिषदेची मान्यता घेतली असल्यामुळे संबंधीतांवर कारवाई करणेत आली नाही.

२. (अ) मौ.कानडेवाडी. (ता.गडहिंग्लज) येथे पाझर तलाव व्हावा यासाठी लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा होता.

(ब) पाझर तलावाचे काम झाल्यास तेथील ग्रामस्थांचा पाण्याचा बिकट प्रश्न सुटणार होता.

(क) शेतकऱ्यांनी सदर काम करण्यासाठी लेखी संमतीपत्रे दिलेली होती. त्यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होणेपूर्वी कामास सुरुवात करण्यात आली.

(ड) बुडीत क्षेत्रातील घरांचे संमतीपत्रे वेळेत मिळू शकली नाहीत. सदर संमतीपत्रे दि.०२/०४/१९९७ ला प्राप्त झाली.

पाझर तलावाची आवश्यकता लक्षात घेवून शेतकऱ्यांची संमतीपत्रे घेवून कामास सुरुवात करण्यात आली. सदर काम दि.०३/१२/२००२ रोजी पूर्ण झाले आहे. तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.एम.जी.नातू हे दि.३०/०४/१९९४ इ.रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होवून जवळ जवळ १७ वर्षे झाली असलेने संबंधीतांवर कारवाई करणेत आलेली नाही.

सचिवांची साक्ष :

समितीने विभागाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीचे अवलोकन करुन सदरच्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १३ जूलै, २०११ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, कानडेवाडी येथील पाझर तलावाच्या बांधकामाच्या संदर्भातील कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी लेखापरिक्षकांना अंदाज पत्रकाची मूळ नस्ती सादर करण्यात आली नाही असा आक्षेप महालेखापालांनी घेतलेला आहे. याबाबतीत संबंधित अधिकाऱ्याचा खुलासा घेण्यात आला आहे. त्यामध्ये त्यानी आपली चूक कबूल केली असून असे म्हटले आहे की, या विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखापरीक्षण कालावधीमध्ये सुरु होते. त्यामुळे लेखा परीक्षकांना अंदाजपत्रकाची नस्ती दाखविता आली नाही. नंतर ती नस्ती उपलब्ध करुन देण्यात आली होती. समितीने त्यावर अशी विचारणा केली की, सदर कामास दोन वेळा प्रशासकीय मान्यता देण्यात आली व दोन वेळा निविदा काढण्यात आल्या. तसेच, जमीन संपादनाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण न होताच कामास सुरुवात करण्यात आली. या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती करावाई करण्यात आली, त्यावर असे सांगण्यात आले की, पाझर तलावाचे काम झाल्यावर तेथील ग्रामस्थांचा पाण्याचा बिकट प्रश्न सुटणार होता. शेतकऱ्यांनी सदर काम करण्यासाठी लेखी संमतीपत्रे दिलेली होती. पाझर तलावाची आवश्यकता लक्षात घेऊन शेतकऱ्यांची संमतीपत्रे घेऊन कामास सुरुवात करण्यात आली. परंतु बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या घराची संमतीपत्रे उशीरा मिळाल्याने मूळ मक्तेदारानी काम करण्यास नकार दिला. त्यानंतर मूळ अंदजपत्रकातील उर्वरित काम पूर्ण करण्यासाठीच्या सुधारित अंदाजपत्रकास जिल्हा परिषद ठराव क्र. ७३६, दि.२९/११/२००१ अन्वये सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. सदर काम सन २००२ मध्ये पूर्ण झालेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, भूसंपादन पूर्णपणे न करताच कामाला सुरुवात करण्यात आली त्यामुळे काम बंद पडले. त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, ज्या शेतकऱ्यांची घरे बुडित क्षेत्राखाली होती त्यांनी काम करण्यास अडविल्यामुळे समस्या निर्माण झाल्या. पाझर तलावाचे काम सुरु करण्यापूर्वीच बुडित क्षेत्राखालील शेतकऱ्यांची समंतीपत्रे मिळविली पाहिजे होती. तसे न केल्यानेच हा प्रश्न निर्माण झालेला आहे. वास्तविक सिंचन क्षमता वाढावी यासाठी पाझर तलावाचे काम केले जाते. परंतु, तेथील अधिकाऱ्याच्या गलथानपणामुळे हे काम पूर्ण होण्यास उशिर झाला. या कामासाठी दोन वेळा प्रशासकीय मान्यता घ्यावी लागली, दोन वेळा निविदा काढण्यात आल्या. दरम्यान दरसुचीमध्ये वाढ झाली. याला कारणीभूत असणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे किंवा नाही, याबाबत समितीने विचारणा केली असता, असा खुलासा करण्यात आला की, मूळ अंदाजपत्रक रक्कमेपेक्षा जादा खर्च हा दरसूचीमध्ये झालेली दरवाढ, वाहन अंतर, ईटीपी चार्जेस व भूसंपादन इत्यादीमुळे झालेला आहे. त्याला जिल्हा परिषदेची सुधारित मान्यता घेतली असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही. हे काम पूर्ण झालेले आहे. तसेच, तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.नातू हे सेवानिवृत्त होऊन जवळपास १७ वर्षे झालेली आहेत.

अभिप्राय व शिफारशी :-

कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत कानडेवाडी ता.गडहिंग्लज येथील पाझर तलावाची जमीन संपादनाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण न होताच बांधकामास सुरुवात झाली असल्याने या कामातील अनियमिततेबाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहिती वरुन असे दिसून येते की, पाझर तलावाच्या बांधकामावर रु.१७,७२,७३२/- एवढा खर्च झाला आहे.

कानडेवाडी येथील पाझर तलावाच्या बांधकामाच्या संदर्भातील कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी लेखापरिक्षकांना अंदाज पत्रकाची मूळ नस्ती सादर करण्यात आली नाही असा आक्षेप महालेखापालांनी घेतलेला आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपली चूक मान्य केली आहे. विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखापरीक्षण कालावधीमध्ये सुरु असल्यामुळे लेखा परीक्षकांना अंदाजपत्रकाची नस्ती दाखविता आली नाही. दिनांक २६/२/१९९२ रोजी या कामास प्रशासकीय मान्यता व दिनांक २९/८/२००१ रोजी दुसरी सुधारित मान्यता मिळाली. त्यामुळे दोन वेळा निविदा काढण्यात आल्या. तसेच, जमीन संपादनाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण न होताच कामास सुरुवात करण्यात आली. या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई होणे आवश्यक होते. तथापि, संबंधित अधिकारी सेवानिवृत्त होवून १७ वर्ष झालेली असल्याने विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही.

पाझर तलावाचे काम झाल्यावर तेथील ग्रामस्थांचा पाण्याचा बिकट प्रश्न सुटणार होता. त्यामुळे पाझर तलावाची आवश्यकता लक्षात घेऊन शेतकऱ्यांची संमतीपत्रे घेऊन कामास सुरुवात करण्यात आली. तथापि, बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या घराची संमतीपत्रे उशीरा मिळाल्याने मूळ मक्तेदारानी काम करण्यास नकार दिला. भूसंपादन पूर्णपणे न करताच कामाला सुरुवात करण्यात आली त्यामुळे काम बंद पडले. ज्या शेतकऱ्यांची घरे बुडित क्षेत्राखाली होती त्यांनी काम करण्यास अडविल्यामुळे समस्या निर्माण झाल्या. ग्रामविकास शासन परिपत्रक क्र. पंरास/१०८८/सी.आर./३०४१ दि.१४ सप्टेंबर, १९९८ व लेखासंहिता नियम ८७ अन्वये जमिन संपादन केल्याशिवाय जमीनीचे काम हाती घेऊ नये असे आदेश असतानाही योजनेची कामे हाती घेतली, त्यामुळे या योजनेचे काम दिर्घकाळ अपूर्ण राहिले असल्यामुळे ११८.९० टक्के जादा दर मंजूर करुन काम करावे लागले.

यावरुन **सदर भूसंपादनाच्या कामात विविध स्तरावर अनियमितता झाल्याचे दिसून आले व त्यामुळे सदरचे काम दिर्घ काळ अपूर्ण राहिल्याने मक्तेदारास रु.२०,५३४/- एवढी जादा रक्कम अदा करण्यात आली, याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. यापुढे भविष्यात भूसंपादनाच्या कामात अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन - तीन

कोल्हापूर, जिल्हा परिषद

मुत्नाळ, तालुका गडहिंग्लज, साईट क्रमांक १ येथे दगडी बंधारा बांधणे. (परिच्छेद क्र.३.२०७)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पूनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.६१) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी मुत्नाळ येथे दगडी बंधारा बांधकामावर रक्कम रुपये २,४४,७६६ खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. सदर कामाची मूळ निविदा श्री.ओम कन्स्ट्रक्शन यांचे नावे मंजूर केलेली होती. सदर निविदा मंजूरीची नस्ती तसेच संबंधितांनी केलेल्या कामाची मोजमाप नोंदवही व मक्ता रद्द प्रक्रिया याबाबत कोणतेही कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाही. याबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

२. ओम कन्स्ट्रक्शन, कोल्हापूर यांचा मक्ता बी-१ निविदा शर्त-३ (अ) नुसार रद्द केल्यानंतर त्यांची अनामत रक्कम जप्त केले बाबत साधार खात्री पटवावी.

३. गडहिंग्लज येथे घाऊक स्वरुपात सिमेंट मिळत असताना अनावश्यकपणे दूरचे ठिकाण विचारात घेण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. दूरचे ठिकाण विचारात घेऊन दर निश्चित केलेने सदर कामासाठी (उर्वरित) वापरलेल्या ४६५ पोती सिमेंटसाठी प्रती बॅग रुपये ११ प्रमाणे रक्कम रुपये ५,११५ + जादा दराची निविदा ३९.०८ टक्के = ७,११४ जादा अदा झाली आहे. जादा रक्कम संबंधितांकडून वसूल करावी.

४. सदर कामाचे मूळ अंदाजपत्रकात सिमेंट फरकाची रक्कम म्हणून दर सूचीमधील प्रती सिमेंट बॅगची किंमत रुपये ८० व इश्यू रेट रुपये १०१.४५ यामधील फरक रुपये २१.४५ विचारात घेऊन दर पृथःकरण केले आहे.

अंदाजपत्रकिय दराप्रमाणे मक्तेदारास काम दिले असल्यामुळे दिलेले सिमेंट फरकाची रक्कम चुकीची आहे. सबब प्रती बॅग रुपये २१.४५ प्रमाणे ४६५ सिमेंट पोत्यांची रक्कम रुपये ९,९७४ + जादा निविदा दर रुपये ३९.०८ टक्के अशी एकूण रक्कम रुपये १३,८७२ संबंधित जबाबदार व्यक्तीकडून वसुल करावी.

५. सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,२६,७७०/- चे केले आहे, तरी सुधारित अंदाजपत्रक उपलब्ध करुन ३९.०८ टक्के जादा दराची निविदा बरोबर असल्याबाबत खात्री पटवावी.

६. दगड बांधकामाचा अंदाजपत्रकात प्रती घनमीटर रुपये ४८७.२० आहे सदर दराचे पृथःकरण पाहता मूळ दरातून प्रती घनमीटर दगडाची किंमत रुपये ४८ वजा करणे आवश्यक असताना रुपये ४० कमी वजा करण्यात आली. प्रती घनमीटर रुपये ८ कमी वजा केल्याने एकूण रुपये ८५४ जादा अदा झाले आहे. जादा आदा रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

७. मोजमाप नोंदवही क्रमांक ४४०२, पृष्ठ क्रमांक ९ बाब क्र.७ च्या एकूण परिमाणाची बेरीज ८४.४० मीटर असताना एकूण परिमाण ८८.४० विचारत घेतले आहे. त्यामुळे जादा ४ मीटर परिमाणाची प्रती मीटर रुपये

२३३.२५ प्रमाणे ९३३+३९.०८ जादा निविदा दर असे एकूण १२९८ जादा अदा झाले आहेत. जादा अदा रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात यावी.

८. मोजमाप नोंदवही क्रमांक ४४०२, पान क्रमांक ५ वर बाब क्र.४ अन्वये एकूण दगड बांधकाम १९०.५१ घनमीटर मापे नमूद असून त्यापैकी मोजमाप नोंदवही क्रमांक ९२३, पृष्ठ क्रमांक ७७ वरील ११३.७० घनमीटर असा संदर्भ नमूद केलेला आहे. सदर मोजमाप नोंदवही उपलब्ध न केल्याने नमूद केलेले परिमाण योग्य असलेची खात्री करता येत नाही. सदर बाबत साधार खुलासा करण्यात यावा.

९. सदर कामासाठी खालीलप्रमाणे दगड, वाळूचे परिमाण वापरले आहे. सदर परिमाणाची महसूल व वनविभाग निर्णय क्रमांक, गौरवर्णी १०८८/४३३/३५९२/ख, दिनांक १८ ऑक्टोबर, २००१ अन्वये प्रती घनमीटर रुपये १७.६५ प्रमाणे होणारी स्वामित्त्व धनाची रक्कम रुपये २,२०६/- संबंधितांकडून वसुल करण्यात यावे.

१०. महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय, ग्रा.पा.फ.१००४/प्र.क्र.प्र./पाफ ०७, मुंबई, दिनांक ११ जानेवारी, १९९९ अन्वये सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याचे चाचणी तपासणी अहवाल घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. सदर बाबत खुलासा करण्यात यावा.

उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. या विभागाने अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखा परिक्षण कालावधीमध्ये सुरु होते त्यामुळे या कामाच्या अंदाजपत्रकाची नसती मूळ निविदा व मक्ता रद्द प्रक्रियाची नस्ती आढळलेली नव्हती. तथापि, आता सदर कामाची नस्ती प्राप्त असून ती लेखा परीक्षणास उपलब्ध आहे.

२. मा.अति.मु.का.अ.जि.प.कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.जिप./ग्रापापुवि/अ`बी-२/वशि/१२३/२००२ दि.२२/३/२००२ अन्वये अनामत रक्कम जप्त करणेत आली आहे.

३. आक्षेपात नमूद केलेली जादा अदा रक्कम रु.७,११४/- वसूल करुन शासनास भरलेली आहे. भरणा चलन दप्तरी ठेवले आहे.

४. सदरचे काम अधिकारा नुरुप जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झालेने इकडून मक्तेदार, चेअरमन, बलभिम मजुर सहाकारी संस्था मार्या. गडहिंग्लज यांना अंदाजपत्रकीय दराने देणेत आलेले आहे. अंदाजपत्रक करणेची कार्यवाही कार्यकारी अभियंता ल.पा.विभाग यांचे कार्यालयामार्फत झालेले असून त्यांचे कडील अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेले इश्यु रेट विचारात घेवून अंदाजपत्रकीय दरामध्ये सिमेंट फरकाचे रकमेचा समावेश केलेला आहे त्यानुसार देयक अदा केले आहे व ते बरोबर आहे.

५. सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक उपलब्ध आहे. सदर निविदा ३९.०८% जादा दराची परंतु चालू दराशी तुलना करता अंदाजपत्रकीय दराने आल्याने योग्य आहे.

६. सदर जादा अदा रक्कम रु.८५४/- वसूल करुन शासनास भरलेली आहे. भरणा चलन दप्तरी ठेवले आहे.

७. सदर जादा अदा रक्कम रु.१,२९८/- वसूल करुन शासनास भरलेली आहे. भरणा चलन दप्तरी ठेवले आहे.

८. मोजमाप नोंदवही क्र.९२३ उपलब्ध करुन ठेवले आहे. त्यामध्ये नमूद केले परिणाम ११३.७० घन मीटर हे बरोबर आहे.

९. सदर कामाचे मूळ अंदाजपत्रकामध्ये रॉयल्टी रकमेचा अंतर्भाव नसलेने स्वामित्व धनाची रक्कम वसूल केली नाही. तथापी स्वामीत्व धनाची रक्कम रु.२२०६/- पुरवठादार यांनी शासनास भरणा केलेली असून भरणा केलेले चलन दप्तरी ठेवणेत आले आहे.

१०. सदर कामासाठी वापलेली साहित्याची (दगड, वाळू) याची चाचणी तपासणी आता घेणेत आलेली आहे. चाचणी अहवाल दप्तरी ठेवलेला आहे.

तरी वरील खुलासा अवलोकनी येणे विषयी विनंती आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

जिल्हा परिषद, कोल्हापूरकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने जिल्हा परिषद कोल्हापूरला भेट दऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ सप्टेंबर, २०१० रोजी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाझर तलावाच्या बाबतीत ज्या पद्धतीने उत्तरे दिलेली आहेत त्याच पद्धतीने याही कामाच्या बाबतीत उत्तरे दिलेली आहेत असे निदर्शनास आणून समितीने अशी विचारणा केली की, नस्ती लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध का झाली नाही, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, अंदाजपत्रक आणि नस्ती दोन्ही उपलब्ध आहेत. कामामध्ये घोळ असल्यामुळे लेखा परिक्षणाच्या वेळी अंदाजपत्रक आणि नस्ती का दाखविण्यात आली नाही अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, अंदाजपत्रक ल.पा.विभागाकडून करण्यात येते व त्यानंतर ते जिल्हा परिषदेकडे दिले जाते. जेव्हा काम जिल्हा परिषदेकडे दिले जाते, त्याचवेळी त्या कामासोबत कामाचे अंदाजपत्रकही देणे आवश्यक आहे. त्यावेळी अंदाजपत्रक जोडलेले नव्हते काय अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर मुख्य कार्यकरी अधिकाऱ्यांनी सांगितले की, १९८८ पूर्वी ग्रामीण पाणी पुरवठा आणि लघु पाटबंधारे विभाग असे दोन वेगळे विभाग होते. लघु पाठबंधारे विभाग १९९८ मध्ये रद्द करण्यात येऊन तो पाणी पुरवठा विभागामध्ये समाविष्ट करण्यात आला. काम अर्धवट स्थितीत हस्तांतरित झालेले आहे काय या कामाला १९९४ पूर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली व सुधारित प्रशासकीय मान्यता २९/११/२००२ ला मिळाली. प्रशासकीय आणि सुधारित प्रशासकीय मान्यता यामध्ये बराच कालावधी गेला असल्याचे समितीने नमूद केले असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काम अर्धवट सोडण्यात आले असा खुलासा केला. समितीने ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकले आहे काय, त्यावर ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकलेले नाही. तथापि, कंत्राटदारावर ३(अ) नुसार कारवाई केलेली आहे.

लेखापरीक्षणाच्यावेळी मोजमाप नोंदवही उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेवर आलेली आहे. या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तेव्हा या कामास कोण जबाबदार आहे, त्यावेळी संबंधित अधिकारी कोण होते अशी विचारणा करुन समितीने या ठिकाणी चूक सावरण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. समितीला असत्य माहिती देऊ नये. असत्य माहिती देणे ही अतिशय गंभीर बाब आहे. अधिकाऱ्यांनी समितीची

दिशाभूल करण्याचा प्रयत्न करु नये. एखादी चूक झाली असेल तर तसे सांगावे. परंतु, कोणत्याही परिस्थितीत असत्य माहिती देऊ नये. असे मत व्यक्त करुन, बंधाऱ्यामध्ये पाणीसाठा आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी बंधारा सुस्थितीत असल्याचे सांगितले. विहीरीला पाणी लागावे, शेतीला पाणी मिळावे हे बंधारा बांधण्या मागील तत्व आहे. लेखापरीक्षकांनी जे परिच्छेद काढलेले आहेत त्या अनुषंगाने समिती आपल्याकडून माहिती घेत आहे. लेखा परीक्षणाच्यावेळी आपण कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत.

लेखापरीक्षकांनी घेतलेल्या आठ-नऊ आक्षेपांच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली आहे काय, त्यावर कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा यांनी कानडेवाडी पाझर तलावात पाणी साठा आहे. तलावास लिकेज नाही, परंतु इनडायरेक्टली पर्क्युलेशन असल्याचे सांगितले, त्यावर समितीने विचारणा केली की, किती क्षेत्राला पाणी पुरवठा होतो, तलावाची साठवण क्षमता किती आहे. त्यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी ३६ हेक्टर क्षेत्राला पाणी पुरवठा होत असून, तलावाची ७.०५ दक्षलक्ष घनफूट क्षमता आहे.

मुत्नाळ दगडी बंधारा कामासाठी वापरलेले दगड, वाळू इत्यादीची चाचणी तपासणी आता घेण्यात आली आहे. चाचणी अहवाल दप्तरी ठेवलेला आहे. प्रश्न असा आहे की, दगड, वाळू चाचणी अहवालात कोणता निष्कर्ष काढलेला आहे. बंधाऱ्याच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल लेखापरीक्षणाच्यावेळी सादर करण्यात आला नाही असे स्पष्टीकरणात नमूद करण्यात आले आहे. "साहित्याची चाचणी तपासणी आता घेण्यात आलेली आहे" खरे म्हणजे लेखापरीक्षणाच्यावेळी चाचणी तपासणी अहवाल देणे आवश्यक होते आता अहवाल देऊन काय उपयोग आहे. समितीला चाचणी तपासणी अहवाल दाखवावा असे समितीने निर्देश दिले असता, समितीला तपासणी अहवाल दाखविण्यात आला. मात्र त्यातील निष्कर्ष समितीला सांगण्यात आले नाहीत, असे समितीला खेदाने नमूद करावे लागत आहे. त्यावर मुख्य कार्यकरी अधिकाऱ्यांनी लेखापरीक्षणाच्यावेळी साहित्य चाचणी तपासणी अहवाल दाखविण्यात आला नाही व ही चूक झाली असल्याचे मान्य केले, त्यावर समितीने या सर्व गोष्टीस कोण जबाबदार आहे, ही जबाबदारी कोणावर निश्चित करणार आहात, अशी समितीने विचारणा केली असता विभागाकडून याबाबत उत्तर प्राप्त झाले नाही. लेखापरीक्षणाच्यावेळी ज्या अधिकाऱ्यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत त्या अधिकाऱ्याला जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला सादर करावी, असे समितीने निर्देश देऊन या प्रकरणी सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय समितीने घेतला.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यांसंदर्भात विभागाकडुन अधिक माहिती मागविली.

मुत्नाळ साईट क्रमांक १ येथील दगडी बंधारा बांधकामाची कागदपत्रे संबंधीतांनी लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविली नाहीत त्यामुळे सदर कामातील विविध बाबीची खातरजमा लेखापरिक्षकांना करता आली नाही यास जबाबदार

असणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, उक्त प्रकरणातील कागदपत्रे व त्याचे लेखा परिक्षण यांची सद्यःस्थिती काय आहे.

उपरोक्त मुद्यासंदर्भात विभागाकडुन तसेच कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. मुत्नाळ येथील साईट क्र.१ दगडी बंधारा बांधणे या कामाची कागदपत्रे लेखा परिक्षणाचे वेळी उपलब्ध करुन देणेत आली होती, तथापि या विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखापरिक्षण कालावधीमध्ये (२००५-२००६) सुरु होते. यामुळे लेखा परिक्षणास निविदा मंजूरीची नस्ती, मोजमाप पुस्तक व मक्ता रद्द केलेची प्रक्रिया नस्ती दाखविता आली नाही. सद्यःस्थितीत सदर अभिलेख दप्तरी उपलब्ध आहेत.

२. मुत्नाळ ता.गडहिंग्लज येथील दगडी बंधारा बांधणेचे रु.२,४६,५२८/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक दि.९/८/१९९४ ने तांत्रिक मान्यता घेवून जलसंधारण समिती ठराव क्र.८ दि.२८/८/१९९४ ने प्रशासकीय मंजूरी मिळाली व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दि.७/५/१९९७ ने कामाचा आदेश देणेत आला. सदर कामाचे लेखा परिक्षण सन २००५-२००६ मध्ये करणेत आले. कार्यकरी अभियंता स्तरावर अंदाजपत्रकाची पुन्हा छनणी करता नमूद केलेले परिमाण व त्यासाठी दिलेले दर योग्य आढळतात.

३. संबंधीतांना लेखा परिक्षणासाठी जरुर ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबत नोटीसा लागू करणेत आलेल्या होत्या. तद्नंतर संबंधीतांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्याने पुढील कारवाई करण्यात आली नाही.

४. आता सदर कामाची सर्व कागदपत्रे/नस्ती उपलब्ध आहेत.

सचिवांची साक्ष :

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने १३ जुलै, २०११ रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, मुत्नाळ साईट क्रमांक १ येथील दगडी बंधारा बांधकामाची कागदपत्रे संबंधितांनी लेखा परीक्षणाच्या वेळी दाखविली नाहीत. त्यामुळे सदर कामातील विविध बाबींची खातरजमा लेखापरीक्षकांना करता आली नाही. यास जबाबदार असाणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, उक्त प्रकरणातील कागदपत्रे व त्याचे लेखा परिक्षण यांची सद्यःस्थिती काय आहे, त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, या विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखा परीक्षण कालावाधीमध्ये सुरु होते. त्यामुळे लेखा परीक्षणास, निविदा मंजुरीची नस्ती, मोजमाप पुस्तक व मक्ता रद्द केल्याची प्रक्रिया नस्ती दाखविता आली नाही. सद्यःस्थितीमध्ये सदर अभिलेख दप्तरी उपलब्ध आहेत. या प्रकरणाबाबत श्री.डोंगरे शाखा अभियंता यांच्यावर १ वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली असल्याचे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

कोल्हापूर जिल्हा परिषदेतील मुत्नाळ येथे दगडी बंधारा बांधकामाच्या कामातील कागदपत्रे लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत या संदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, तसेच साक्षीच्या वेळी

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सदर योजनेच्या बांधकामावर रुपये २,४४,७६६/- एवढी रक्कम खर्च करण्यात आली.

सदरच्या बांधकामास तांत्रिक मान्यता दिनांक ९/८/१९९४ रोजी व प्रशासकीय मान्यता दिनांक २८/८/१९९४ रोजी मिळाली. निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचा आदेश दिनांक ७/५/१९९७ रोजी देण्यात आला. प्रशासकीय मान्यता व कामाचा आदेश यामध्ये जवळ जवळ ३ वर्षाचा कालावधी लागला आहे. या कामास सुधारित मान्यता दिनांक २९/११/२००२ ला मिळाली. यावरुन असे दिसून येते की, तांत्रिक, प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता त्याचप्रमाणे कामाचा आदेश उशिरा देणे या मध्ये बराच कालावधी गेला असल्याचे दिसून येते.

ठेकेदार वेळेत काम करित नाहीत, मध्येच काम अर्धवट सोडून जातात अशा ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यासंदर्भात समितीने वारंवार मागणी करुनही ठेकेदारावर कारवाई केली जात नाही. तथापि, ठेकेदाराला पाठीशी घालण्यात येत आहे. **सबब, मे. ओम कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने त्याचे काम अर्धवट सोडले या प्रकरणी त्याला काळ्या यादीत टाकण्यात यावे अशी शिफारस समिती करीत आहे.**

मुत्नाळ साईट क्रमांक १ येथील दगडी बंधारा बांधकामाची कागदपत्रे संबंधित अधिकाऱ्यांनी लेखा परीक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. सदरची नस्ती उपलब्ध करुन देण्यास शाखा अभियंत्याने टाळाटाळ केली असल्यामुळे मुत्नाळ दगडी बंधारा कामासाठी वापरलेले दगड, वाळू इत्यादींची व इतर साहित्याची चाचणी अहवालात कोणते निष्कर्ष काढण्यात आले याची माहिती लेखापरीक्षकांना मिळाली नाही. लेखापरीक्षकांना कामातील विविध बाबींची खातरजमा करुन घेता आली नाही हे यावरुन स्पष्ट झाले आहे. या विभागाचे अभिलेख वर्गीकरणाचे काम लेखा परीक्षण कालावधीमध्ये सुरु होते. त्यामुळे लेखा परीक्षणास निविदा मंजुरीची नस्ती, मोजमाप पुस्तक व मक्ता रद्द केल्याची प्रक्रिया नस्ती लेखा परीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आली नाही ही माहिती सचिवांच्या साक्षीच्या वेळी उघडकीस येऊनही कारवाई करण्यात आली नाही. **अभिलेख वर्गीकरणाचे जरी काम सुरु असले तरी एखादी नस्ती उपलब्ध करुन देता आली असती असे समितीने स्पष्ट मत व्यक्त करुन तीव्र नापसंती व्यक्त केली. ज्या शाखा अभियंत्यांनी कागदपत्रे व नस्ती उपलब्ध करुन दिली नाही व कर्तव्यात कसुर केल्या प्रकरणी त्या शाखा अभियत्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व यापुढे असे घडणार नाही याची दक्षता जिल्हा परिषदेने घेण्यात यावी.**

समिती अशीही शिफारस करते की, उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात कळविण्यात यावी.

प्रकरण चार- एक

नाशिक, जिल्हा परिषद

जिल्हा **परिषद आवार उपहारगृह भाडे वसुली बाबात (परिच्छेद क्र. ३.७)**

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.३) जिल्हा परिषद, नाशिक येथील जिल्हा परिषद आवार उपहारगृहाचे भाडे मार्च, २००५ अखेर रक्कम रुपये ६,०४,६९२ इतके थकीत असल्याचे दिसुन येते. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :-

१. सदरची थकबाकी ही सप्टेंबर, १९९५ पासुन आजपावेतो सदर उपहारगृहाचे भाड्यापोटी कुठल्याही प्रकारची वसुली केलेली नाही, किंवा वसुलीबाबत ठोस कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. थकबाकी रकमेच्या त्वरित वसूलीबाबत ठोस प्रभावी उपाययोजना करुन रक्कम संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून खालील प्रमाणे खुलासा प्राप्त झाला.

नाशिक जिल्हा परिषद आवारातील उपहार गृहाचे चालक श्री.दत्तात्रय जयराम मोरे व श्रीमती चंद्रभागा जयराम मोरे यांना भाडेपोटी देय वसुली भरणे बाबत या कार्यालयाची नोटीस क्रमांक साप्रवि/ग्राप/मालमत्ता/२९/०६ दिनांक ४/०४/२००६ अन्वये नोटीस देण्यात आलेली होती. याबाबत उपहारगृह चालक यांनी मे. कोर्टात दावा/अर्ज दाखल करुन एकतर्फी हुकूम घेवू नये म्हणून कॅव्हेट अर्ज नं.१०१/२००६ दाखल करण्यात आलेला होता. तरीही उपहारगृह चालक यांनी भरणा केलेला नाही. जिल्हा परिषदेचे वकीलाचे मार्गदर्शन घेवून न्यायालयात दिनांक ३/०३/२००८ कॅव्हेट अर्ज नं.७१/२००८ दाखल करुन दिनांक १३/०३/२००८ नोटीशीद्वारे सात दिवसात थकीत भाडे एकरकमी जिल्हा परिषदेला अदा करणे बाबत श्री.मोरे यांना कळविले. श्री.मोरे यांनी मुदतीत थकीत भाडे न भरल्याने दिनांक १५/०४/२००८ रोजी २४ तासात जागेचा ताबा जिल्हा परिषदेस देणे व ३० दिवसांत थकीत भाडे खर्चासह भरणे बाबत श्री.मोरे यांना नोटीस देण्यात आली होती. त्याप्रमाणे श्री.मोरे यांनी उपहारगृहाच्या जागेचा ताबा २४ तासात जिल्हा

परिषदेस न दिल्याने २८/४/२००८ रोजी सकाळी ८:१५ वाजता उपहारगृहाची जागा उपस्थित पंचासमक्ष पंचनामा करुन जिल्हा परिषदेने ताब्यात घेतलेली आहे. थकीत वसुलीचा दावा दिवाणी न्यायालयात दाखल केल्यास दाव्याचे निकालास प्रदिर्घ कालावधी लागेल. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या वकीलाचे मार्गदर्शन घेवून जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १४१ (क) (१) नुसार जमीन महसुलाची थकबाकी (आरआरसी) म्हणुन माहे सप्टेंबर, १९९५ ते माहे एप्रिल, २००८ पावेतो निश्चित केलेले दरमहा भाडे रुपये ४५८१/- प्रमाणे रुपये ६,९६,३१२/- व माहे एप्रिल, २००९ पावेतो १८% दराने व्याज रुपये २३,४६,७०३/- अशी थकीत भाडे रक्कम रुपये ३०,४३,०१५/- इतकी थकीत रक्कम उपहारगृह चालक यांचेकडून वसुल करुन जिल्हा परिषदेला मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र जा.क्र.साप्रवि/ग्रापं/मालमत्ता/२९३/०९ दिनांक १६/०७/२००९ अन्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदरची थकीत रक्कम त्वरीत वसुल करुन मिळणेबाबत या कार्यालयाचे पत्र जा.क्र.साप्रवि/ग्रापं/मालमत्ता/३५/१० दिनांक २१/०१/२०१० अन्वये तहसिलदार, नाशिक यांना कळविले आहे. तसेच या कार्यालयाचे अर्धशासकीय पत्र जा.क्र.साप्रवि/ग्रापं/मालमत्ता/१५९/१० दिनांक २१/६/२०१० अन्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांना देखील विनंती करण्यात आलेली आहे. पुनश्चः दिनांक १७/०९/२०१० व १३/०९/२०१० नुसार म.जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना सदर प्रकरणी वसुली करणे संदर्भात स्मरणपत्र देण्यात आले आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यसाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उपहारगृहाचे भाडे माहे सप्टेंबर, १९९५ पासून नियमितपणे दरमहा वसूल का करण्यात आले नाही तसेच कायदेशीर कार्यवाही वेळीच न करण्याची कारणे काय, यावर माहिती पुस्तिकेमध्ये जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल नमूद केला असल्याचे समितीस सांगण्यात आले. जिल्हा परिषदेने २००६ मध्ये उपहारगृह चालकास पहिली नोटीस दिली तद्नंतर या संदर्भात २००८ मध्ये जिल्हा परिषदेने संबंधित उपाहारगृह चालकास उपहारगृह खाली करण्याबाबत कळविले होते, तरी सुद्धा उपहारगृह चालकाने उपहारगृह खाली केले नाही. तद्नंतर जिल्हा परिषदेने पंचासक्षम पंचनामा करुन उपहारगृह ताब्यात घेतले व सन १९९९ पासून उपहारगृह चालक विहित भाडे देत नव्हता, या शिवाय जिल्हा परिषदेची स्वतःची जागा असताना व जागा खाली करण्याची नोटीस देऊनही जागा खाली केली नाही. तरी सुद्धा जिल्हा परिषदेला स्वतःची जागा ताब्यात घेण्यासाठी २ वर्षांचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सदरहू उपहारगृह चालकास नोटीस दिली होती. शिवाय न्यायालयात सुद्धा केस दाखल केली.

उपहारगृह चालकाकडून भाडे वसुल करण्याची किंवा जागा खाली करण्याची जबाबदारी कोणाची होती, असे समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ही जबाबदारी उप मुख्य

कार्यकारी अधिकरी (ग्रामपंचायत) यांची होती. उपहारगृह चालकास भाडे भरण्याची प्रथम नोटीस दिल्यानंतर, कॅव्हेट दाखल करण्याबाबत जो पत्रव्यवहार झाला त्यामध्ये वकिलांचे मत जाणून घेण्यामध्ये थोडासा उशीर झालेला आहे. त्यावर समितीने जिल्हा परिषदेतील उपहारगृहाच्या चालकाकाडून भाडे वसुल न केल्यामुळे जिल्हा परिषदेचे नुकासान झालेले आहे. त्यामुळे सदरहू उपहारगृह चालकाकडून भाडे वसुल करण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे होती त्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करुन वकिलाचा सल्ला मागण्यासाठी किती वेळ लागला होता, अशी समितीने विचारणा केली असता सांगण्यात आले की, दिनांक ४/११/२००६ रोजी वकिलाचा सल्ला घेतला होता. वकिलाचा सल्ला मिळाल्यानंतर कॅव्हेट दाखल करण्यास आपल्याला पावणेदोन वर्ष का लागली, अशी समितीने पृच्छा केली असता सांगण्यात आले की, नाशिक जिल्हा परिषदेच्या आवारातील उपहारगृहाच्या चालकाकडून पैसे वसूल करण्यात विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. जिल्हा परिषदेच्या आवारात उपहारगृह असावे अशी या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांची मागणी होती. संबंधित उपहारगृहाच्या चालकाकडून पैसे वसुल करण्याच्या संदर्भात म्हणावा तसा पाठपुरावा झालेला नाही. जिल्हा परिषदेच्या आवारात पत्र्याच्या शेडमध्ये उपहारगृहाचे काम सुरु होते. हे उपहारगृह सुरु रहावे यासाठी कर्मचाऱ्यांच्या संघटनेने जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची परवानगी घेतली होती व त्यानंतर हे काम सुरु राहिले. यापूर्वी सुद्धा एका ठेकेदाराला उपहारगृह चालविण्याची परवानगी देण्यात आली होती, परंतु पूर्वीच्या ठेकेदाराला उपहारगृह चालविणे परवडत नसल्यामुळे सहा महिन्यात त्याने उपहारगृहचे काम बंद केले होते. त्यामुळे श्री.दत्तात्रय मोरे व श्रीमती चंद्रभागा मोरे या दांपत्यास उपहारगृह चालवण्यासाठी देण्यात आले. या उपहारगृहाचे भाडे निश्चित करण्याचा प्रस्ताव तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केला होता. परंतु भाडे निश्चित करण्याची नोटीस बजावली गेली नाही त्यामुळे उपहारगृह तसेच सुरु राहिले.

समितीने विचारणा केली की, संबंधित उपहारगृह चालकाकडून पैसे वसुल करण्याची जबाबदारी कोणाची होती, त्यावर सांगण्यात आले की, वसूल करण्याची जबाबदारी तत्कालीन कार्यकारी अभियंता, (बांधकाम) यांच्याकडे होती. त्यापैकी एक कार्यकारी अभियंता निवृत्त झालेले असून त्याच प्रकरणाशी संबंधित दुसरे कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. समितीने विचारणा केली की, जे कार्यकारी अभियंता निवृत्त झालेले आहेत त्यांना आजच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते काय, त्यावर असे सांगण्यात आले की, श्री.चंदेलवार, कार्यकारी अभियंता निवृत्त, दुसरे कार्यकारी अभियंता श्री.देवरे हे नाशिक येथेच रहात असून त्यांना आजच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्यासंबंधी हस्तबटवड्याने पत्र देण्यात आले होते परंतु ते आजच्या बैकीसाठी उपस्थित राहिलेले नाहीत. बैठकीसाठी संबंधितांनी उपस्थित रहावे याबाबत संबंधितांना पत्र देऊन सुद्धा तत्कालीन कार्यकारी अभियंता आजच्या बैठकीसाठी उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे यासंदर्भात संबंधित सचिवांची साक्ष घेऊन अशा बेजबाबदारपणाबद्दलची माहिती घेतली जाईल असे समितीने आपले मत व्यक्त केले.

उपहारगृह चालकाकडून रुपये ३०,४३,०१५/- एवढ्या रक्कमेची वसुली करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक १६/७/२००९ रोजी सादर करण्यात आलेला होता. हा प्रस्ताव पाठविण्यास दोन वर्षे लागण्याची कारणे काय, अशी विचारणा केली असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, उपहारगृह

चालकाला वसूलीसंदर्भात नोटीस देण्यात आली होती. त्याचप्रमाणे उपहारगृह चालकाकडून व्याज व भाडे धरुन रु.३०,४३,०१५/- एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. उपहारगृह चालकाकडे दुसरी कोणतीही मालमत्ता नसल्यामुळे रक्कम वसूल होऊ शकलेली नाही.

उपहारगृह चालकाला उपहारगृह सुरु करण्यास १९९३ मध्ये परवानगी दिली होती परंतु त्यावेळेस आपण जागेचे भाडे ठरवले नव्हते. या उपहारगृहाचे भाडे सन १९९९ मध्ये ठरवले होते. याचा अर्थ पाच वर्षे उलटल्यानंतर भाडे ठरविले. ज्यावेळेस उपहारगृह चालविण्यास दिले जाते त्यावेळेस भाडे का ठरवले नाही, अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी, वसुली करण्याच्या संदर्भात विलंब झालेला आहे व त्याबाबतची वस्तुस्थिती मान्य केली आहे. उपहारगृहचे भाडे निश्चित झाले नसल्याचे समजल्याबरोबर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये भाडे निश्चित झाले. असल्याचे समितीस विदित केले.

समितीने पुन्हा विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या प्रांगणात हा प्रकार सुरु होता तरी सुद्धा आपल्याला हा प्रकार समजला नाही, वसुली करण्याच्या संदर्भात सर्व अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे याबाबत समितीने नापसंती व्यक्त केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेचा कार्यभार मी दोन वर्षापासून घेतलेला आहे. उपहारगृहाच्या मालकाची अजून कोठेकोठे मालमत्ता आहे याची आम्ही चौकशी करीत आहोत. त्यावर समितीने पंचायत राज समिती जिल्हा परिषदेला भेट देणार आहे हे समजल्यामुळेच दिनांक १/९/२०१० व १३/९/०१० रोजी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना स्मरणपत्र पाठविली आहेत असे म्हटले तर त्यात काही वावगे होणार नाही. आजच्या बैठकीसाठी कोणकोणत्या तत्कालीन व निवृत्त अधिकाऱ्यांना पत्र पाठवून बोलविण्यात आले होते याची प्रत समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे निर्देश दिले.

या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची सविस्तर माहिती समितीला देता आलेली नाही त्याचप्रमाणे या संदर्भात सचिवांची साक्ष घेतली जाणार आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करुन समितीला १५ दिवसात चौकशीचा अहवाल सादर करावा व जे अधिकारी यामध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने निदेश दिले.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यासंदर्भात अधिक माहिती मागितली :-

१. नाशिक जिल्हा परिषदेच्या आवारातील उपहारगृह सन १९९३ पासून सुरु असताना त्याचे भाडे सन १९९९ मध्ये तब्बल ६ वर्षांनी घेण्याची कारणे काय आहेत ? तसेच १९९९ मध्ये निश्चित केलेल्या दरानुसार भाडे वसुल न करण्याची कारणे काय आहेत ? भाडे निश्चित करताना उपहारगृहाच्या चालकांना याची कल्पना दिली होती काय असल्यास, केव्हा ?

२. उपहारगृहाचे भाडे वसुल करण्याची जबाबदारी असलेल्या कार्यकारी अभियंता श्री.चंदेलवार तसेच श्री.देवरे यांनी आपल्या कार्यकाळात भाडे वसुल करण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न केले होते या बाबतचा तपशील

देण्यात यावा. भाडे वसुलीची जबाबदारी उक्त दोन्ही कार्यकारी अभियंत्यांवर ठेवण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तसेच शासनाने काय कार्यवाही केली आहे ?

३. समितीच्या दिनांक २९/९/२०१० रोजी झालेल्या बैठकीच्या वेळी उपस्थित दोन्ही कार्यकारी अभियंता बैठकीस उपस्थित राहण्याचे पत्र जिल्हा परिषदेने त्यांना पाठवून देखील ते अनुपस्थित राहिल्याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेने ग्रामविकास विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला पाठविला होता काय ? असल्यास केव्हा व त्यानुसार त्यांच्याविरुद्ध शासनाने काय कर्यवाही केली आहे ?

४. उपहारगृहाचे निश्चित केलेले भाडे संबंधितांकडून वुसल न करणे हे कितपत संयुक्तीक आहे ? उपहारगृहाच्या भाडे वसुलीसंदर्भात आता शासनाची भुमिका काय आहे ?

उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

श्रीमती चंद्रभागा जयराम मोरे व श्री.दत्तात्रय जयराम मोरे यांचेकडील दिनांक २५/०८/१९९२ रोजीचा अर्ज व त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेतील विविध संघटनांनी त्यांचेकडील दिनांक २६/०८/१९९२ च्या पत्रान्वये श्री.मोरे यांना उपहारगृह चालविण्यास देणेबाबत संमती दिली आहे. तत्कालीन मा.ना.अध्यक्ष, जिल्हा परिषद यांनी तोंडी सुचनेनुसार सदर उपहारगृह चालविणेबाबत आदेश दिले होते मात्र कोणताही लेखी स्वरुपाचा आदेश दिलेला नाही व करारनामा देखील केलेला नाही.

श्रीमती चंद्रभागा जयराम मोरे व श्री.दत्तात्रय जयराम मोरे यांनी जिल्हा परिषद आवारातील उपहारगृहासाठी उभारलेल्या तात्पुरत्या शेडमध्ये दिनांक ०१/१०/१९९२ पासून उपहारगृह सुरु केलेले होते त्यासाठी नाममात्र रुपये ८००/- या प्रामणे दरमहा भाडे निश्चित करण्यात येवून अनामत रक्कम रुपये ५०००/- जि.मध्यवर्ती सह.बँक लि.जि.प.शाखा नाशिक येथे दिनांक २०/०४/१९९३ रोजी भरणा केलेली आहे.

प्रश्नात नमुद केल्यानुसार सदरची बाब नसून महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ नुसार जिल्हा परिषदेच्या मालमत्तांच्या देखभाल कार्यवाहीस आणि दुरुस्ती परिक्षणास कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद आणि तालुका स्तरावर उप अभियंता हे जबाबदार असतील तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ चे कलम १२८ नुसार जिल्हा परिषदेस मालमत्ता भाडे पट्टयाने देण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ चे कलम ११६ अन्वये निविदा प्रक्रिया करुन जागा/इमारत भाडे पट्टयावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावतीने भाडे पट्टा, करारनामा करणे ही कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. सन सप्टेंबर, १९९५ ला उपहारगृह इमारत तयार झाल्यावर उपअभियंता यांनी या इमारतीचे भाडे रुपये ४५८१/- निश्चित केले.

त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ चे कलम ११६ प्रमाणे संविदा कार्यवाही करुन जागा भाडे पट्टयाने देण्याचा करारनामा करणे आवश्यक होते तशी कार्यवाही तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी केली नाही. श्री.मोरे यांना मुल्यांकनानुसार ठरलेले प्रतिमहा रुपये ४५८१/- भाडे कळविलेले नाही तसेच करारनामा करणेबाबत अवगत देखील केलेले नाही.

श्री.एस.बी.चंदेल हे कार्यकारी अभियंता या पदावर दिनांक १/४/२००२ ते दिनांक १३/६/२००५ पावेतो कार्यरत होते. तसेच ते माहे डिसेंबर, २००८ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री.डी.बी.देवरे हे कार्यकारी अभियंता या पदावर दिनांक २५/६/२००५ ते दिनांक ५/६/२००८ पावेतो कार्यरत होते. श्री.चंदेल व श्री.देवरे कार्यकारी अभियंता यांनी भाडेवसुली बाबत काहीही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

दिनांक ०७/०५/१९९९ रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शाम तागडे, यांनी आज पर्यंतचे भाडे तात्काळ वसुल करावे, जाहीर निविदेद्वारे ठेका मागविण्यात यावा असे आदेशित केलेले असतांना तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सन १९९९ ते दिनांक १६/१२/२००५ पावेतो काही कार्यवाही केलेली नाही.

या कार्यालयाचे पत्रक्र.जिपना/बांखा/इवद-१/आस्था-४ब/२२७/२०१० अन्वये श्री.एस.बी.चंदेल व श्री.डी.बी.देवरे कार्यकारी अभियता यांना उपस्थित राहणेबाबत पत्र देण्यात आलेले होत. सदर साक्षीच्या वेळी श्री.एस.बी.चंदेल हे उपस्थित राहीले नाहीत म्हणून या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि/आस्था-१/३४८/२०११ दिनांक ०७/०४/२०११ अन्वये बजावण्यात आलेली आहे मात्र अद्यापपावेतो खुलासा प्राप्त नाही. तसेच श्री.एस.बी.चंदेल, डिसेंबर, २००८ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री.डी.बी.देवरे हे दिनांक ३०/०९/२०१० व दिनांक ०१/१०/२०१० रोजी साक्षीस उपस्थित होते. श्री.एस.बी.चंदेल यांचा खुलासा प्राप्त नसल्याने अनुपस्थितीबाबतचा योग्य तो अहवाल मा.प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/आस्था-१/९४६/२०११ दिनांक १५/०९/२०११ अन्व्ये सादर करण्यात आलेला आहे.

दिनांक १६/१२/२००५ रोजी सदर नस्ती ग्रामपंचायत विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर उपहारगृहाच्या रु.५,७७,२०६/- व त्यावरील १८ टक्के व्याज रु.५,४४,२२५/- याप्रमाणे एकूण रु.११,२१,४३१/- वसूलीबाबत दिनांक ०४/०४/२००६ अन्वये नोटीस देण्यात आलेली होती. याबाबत उपहारगृह चालक यांनी न्यायालयात दावा/अर्ज दाखल करुन एकतर्फी हुकुम घेवू नये म्हणून कॅव्हेट अर्ज नं.१०१/२००६ दाखल करण्यात आलेला होता. तरीही त्यांना भरणा न केल्याने जिल्हा परिषदेच्य वकिलांचे अभिप्राय घेवून न्यायालयात दिनांक ०३/०३/२००८ रोजी कॅव्हेट अर्ज नं.७१/२००८ दाखल करुन दिनांक १३/३/२००८ रोजी तसेच दिनांक १५/०४/२००८ रोजी नोटीस देण्यात आलेल्या होत्या.

नोटीस देण्यात येवूनही संबंधीताने वसुलपात्र रक्कम जिल्हा परिषदेस अदा न केल्याने मुख्य कार्याकारी अधिकारी, यांचेकडील आदेश क्र.साप्रवि/ग्रापं/मालमत्ता/१८/२००८ दिनांक २३/०४/२००८ अन्वये उपहारगृहाची जागा संबंधीत चालकांकडून ताब्यात घेणेकामी आदेश निर्गमित करुन दिनांक २८/०४/२००८ रोजी उपहारगृहाची जागा विहित पंचनामा करुन रिकामी करुन घेण्यात आलेली आहे. तद्नंतर प्रलंबित भाडे वसुली संबंधात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १४१ (क) (१) नुसार जमीन महसूलाची थकबाकी (आर.आर.सी.) म्हणून सप्टेंबर, १९९५ ते एप्रिल, २००८ पावतो प्रतिमहा रु.४५८१/- थकित भाडे व त्यावर एप्रिल, २००९ पावेतो १८% व्याज एकूण रक्कम रु.३०,४३,०१५/- वसुलीचा सविस्तर प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/मालमत्ता/२९३/०९ दिनांक १६/०७/२००९ अन्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आला होता.

त्यानुसार तहसिलदार, नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्र.आ.आर.सी/कावि/१४६/२०११ दि.२८/०६/२०११ अन्वये श्रीमती चंद्रभागा जयराम मोरे व श्री.दत्तात्रय मोरे यांचे नावे नाशिक येथे कोणतीही स्थावर मिळकत आढळून येत नसल्याचे व संबंधीताने वसुलपात्र रक्कम भरण्यास तयार नसल्याचा जबाब दिलेला आहे असे कळविले आहे.

तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/ग्रापं/मालमत्ता/२०११ दिनांक ९ मे, २०११ अन्वये ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत ओझर (मिग) ता.निफाड जि.नाशिक व तलाठी, ओझर (मिग) ता.निफाड यांना श्रीमती चंद्रभागा जयराम मोरे व श्री.दत्तात्रय जयराम मोरे यांचे नावे ओझर मिग येथे काही स्थावर मालमत्ता आहे का याबाबत विचारणा केली असता ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत ओझर (मिग) यांनी त्यांचेकडील पत्र क्र.१४१/२०११ दिनांक १०/०५/२०११ अन्वये ओझर गावठाण हद्दीतील ग्रामपं ायत अभिलेख्यांची शहानिशा केली असता कोणत्याही प्रकारची मालमत्ता आढळून येत नाही असे कळविलेले आहे.

तसेच तलाठी, ओझर यांनी देखील त्यांचेकडील पत्र क्र.८६६/२०११ दिनांक १०/०५/२०११ अन्वये श्रीमती चंद्रभागा जयराम मोरे व श्री.दत्तात्रय जयराम मोरे यांचे नावे शेती/बिन शेती खाते नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे सदरील रक्कम वसुल करणेकामी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ चे कलम १४१ (क) (२) नुसार राज्यशासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच तत्कालीन जबाबदार असलेल्या कार्यकारी अभियंता यांचे संयुक्त चौकशीकामी दोषारोप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

सचिवांची साक्ष :-

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या आवारातील उपहारगृह सन १९९३ पासून सुरु असताना त्याचे भाडे १९९९ मध्ये म्हणजे तब्बल ६ वर्षांनी घेण्याची कारणे काय आहेत, भाडे निश्चित करताना उपहारगृहाच्या चालकांना याची कल्पना दिली होती काय, असल्यास केव्हा, या संदर्भात विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, १९९२ साली त्या ठिकाणी उपहारगृह प्रत्यक्षात नव्हते. १० x १० या आकाराचे पत्र्याचे तात्पुरते शेड उभे केले हाते. सन १९९२ मध्ये श्री.चव्हाण यांनी हे उपहारगृह चालविण्यासाठी घेतले, परंतु त्यास उपहारगृह चालविणे परवडत नसल्यामुळे त्याने ते सोडून दिले. त्यानंतर मोरे दांपत्याने सदर उपहारगृह चालविण्यासाठी जिल्हा परिषदेकडे अर्ज केला होता. श्री.चव्हाण यांनी हे उपहारगृह चालविणे बंद केल्यामुळे जिल्हा परिषदेच्या कर्मचारी संघटनेने श्री.मोरे यांना उपहारगृह चालविण्यास संमती दिली. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी हे उपहारगृह चालविण्यासाठी तोंडी परवानगी दिली होती. त्याबाबत लेखी स्वरुपाचा आदेश दिलेला नव्हता. जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये अन्य उपहारगृहाची कोणतीही सोय नव्हती, त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी श्री.मोरे यांनी केलेल्या विनंतीनुसार हे उपहारगृह त्यांना चालविण्यासाठी दिले. त्यावेळी त्या जागेचे भाडे दरमहा ८००/- रुपये व अनामत रुपये ५,०००/- एवढी रक्कम निश्चित करण्यात आली होती त्यानुसार श्री.मोरे यांनी रु.५०००/- एवढी

अनामत रक्कम भरली होती, परंतु दरमहा ८०० रुपये भाडे देणे परवडत नसल्यामुळे दरमहा ३०० रुपये भाडे आकारण्यात यावे अशी जिल्हा परिषदेला विनंती केल्यामुळे भाड्याचा प्रश्न निर्माण झाला.

सन १९९५ साली नवीन उपहारगृहाची इमारत तयार झाल्यांनतर ५८० चौ.फूटाच्या नवीन जागेमध्ये उपहारगृह स्थलांतरीत करण्यात आले. त्या उपहारगृहाचे भाडे रु.४५८१/- एवढे ठरविण्यात आले. परंतु तेही भाडे देणे परवडत नाही असे श्री.मोरे यांनी जिल्हा परिषदेला कळविले होते. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये व उपहारगृहासाठी जागेचा भाडेपट्टा ठरविण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला असल्यामुळे तो विषय सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला व सन १९९९ मध्ये भाडे ठरविण्यात आले. १९९९ मध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी श्री.मोरे यांच्याकडून थकित भाड्याची वसुली करावी व सदर उपहारगृहासाठी जाहीर निविदेद्वारे कंत्राट द्यावे असे दोन अभिप्राय नस्तीत लिहिले होते.

परंतु तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांनी सन १९९९ ते २००५ पर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. त्यानंतर या विषयाची नस्ती जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात आली होती. यापूर्वी काही कारणास्तव सदरची नस्ती २-३ वेळा परत आली होती. पण उपहारगृहाची गरज असल्यामुळे प्रथमच सर्वसाधारण सभेत हा विषय मांडण्यात आला. त्यांनतर सन १९९९ ते २००४ पर्यंत ही नस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पडून राहिली होती. २००४ मध्ये सर्वसाधारण सभेसमोर हा विषय का आणला नाही, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर सांगण्यात आले की, सदरची नस्ती सार्वजनिक बांधकाम विभागातील अनुरेखक श्री.जोशी यांच्याकडे पडून होती असा समितीसमोर खुलासा करण्यात आला. याबाबत श्री.जोशी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी पत्नीची तब्येत ठीक नव्हती असे उत्तर दिले. जिल्हा परिषदेला त्यांचे उत्तर समाधानकारक वाटले नाही म्हणून श्री.जोशी यांच्याविरुद्ध करावाई प्रस्तावित केली. या बाबीशी संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.साळुंखे, श्री.देवरे, श्री.विधाते व श्री.चंदेल हे सर्वजण सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करता येत नाही. परंतु श्री.जोशी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. त्यावेळेपासून २२ लाख ४७ हजार रुपये इतकी भाड्याची रक्कम झाली होती. त्याबाबत श्री.मोरे यांना सदर रक्कम वसुलीसाठी नोटीस देण्यात आली होती. परंतु त्यांच्याकडून ही रक्कम वसूल झालेली नाही. याबाबत अधिक चौकशी केली असता श्री.मोरे यांच्या नावे गावच्या ठिकाणी सुद्धा मालमत्ता किंवा शेतजमीन नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे थकीत भाड्याची वसुली होऊ शकली नाही. समितीने विचारणा केली की, आता उपहारगृह कोण चालवित आहे, यावर सांगण्यात आले की, सदरचे उपहारगृह बंद असून ते उपहारगृह आकर्षक नसल्यामुळे दुसऱ्या कोणत्याही माणसांनी चालविण्यासाठी घेतले नाही.

यापूर्वीचे चार कार्यकारी अभियंते सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांनी त्यांच्या काळात भाडे वसुलीसाठी काहीच कार्यवाही केली नाही. त्यांच्यानंतरचे कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविलेले आहे. या संदर्भात समितीने पुन्हा विचारणा केली की, या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात येणार आहे, त्यांच्याकडून रक्कम वसूल झाली नाही तर अधिकाऱ्यांकडून रक्कम वसूल केली जाणार आहे काय,

याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवानोटीस दिलेली आहे. पण यातील प्रमुख मुद्दा वसुलीचा आहे. त्यामुळे श्री.मोरे यांनाही नोटीस दिलेली आहे. विभागीय चौकशीमध्ये कोण कितपत जबाबदार होते ते सिद्ध होईल किंवा या कामाचे नियंत्रण करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी होती त्यांनी आपले काम नीट केले किंवा नाही तेही ठरेल.

समितीने पुढे विचारणा केली की, कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त केव्हा झाले, सेवानिवृत्तीनंतर केव्हाही कारवाई करता येते असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशात नमूद केलेले आहे. हा विषय समितीसमोर येतो. त्यावेळेस गैरप्रकार करणारे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत असे समितीला उत्तर दिले जाते. त्यामुळे या विषयी विधी व न्याय विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली पाहिजे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये काय म्हटले आहे ते समितीला जाणून घ्यावयाचे आहे. याबाबत सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सन २००८ साली निवृत्त झाले आहेत. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेला आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर ४ वर्षाच्या आत संबंधिताविरुद्ध कारवाई करता येते. त्याचप्रमाणे संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करता येतो. यावर समितीने विचारणा केली की, नोकरीच्या काळात जर एखाद्याने गैरप्रकार केला असेल तर त्या व्यक्तीविरुद्ध सेवानिवृत्तीनंतर केव्हाही कारवाई करता येते असे मा. सर्वोच्च न्यायालयाने म्हटलेले आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, श्री.जोशी यांनी ५ वर्षे नस्ती स्वतःकडे ठेवली होती. श्री.जोशी यांची पत्नी दुर्धर रोगाने आजारी होती, त्यामुळे त्यांची मनःस्थीती बरोबर नव्हती असे श्री.जोशी यांनी स्पष्टीकरण दिले होते. त्यांचे उत्तर विभागाला पटले नसल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. परंतु तत्कालीन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी त्यांचे म्हणणे मान्य केले होते. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली नव्हती. श्री.जोशी यांच्या उत्तरानंतरही त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती, ती करण्यात आली नसल्यामुळे ती करण्यात यावी असा प्रस्ताव ग्रामविकास विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेला आहे.

विभागीय चौकशी सुरु झाल्यानंतर त्याची प्रक्रिया सहा महिन्यात पूर्ण झाली पहिजे. सहा महिन्यात प्रक्रिया पूर्ण झाली नाही तर संबंधित कर्मचाऱ्यास/अधिकाऱ्यास पुन्हा कामावार घेतले जाते. अधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना पाठीशी घातलेले आहे. चौकशी अधिकारी नेमल्यानंतर त्यांनी सहा महिन्यात चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर करण्याचे बंधन घातले पाहिजे. तसेच जिल्हा परिषदने आतापर्यंत कारवाई करावायास पहिजे होती. अशी विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, श्री.जोशी यांनी केलेला खुलासा जिल्हा परिषदेने मान्य केला असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. श्री.जोशी यांची पत्नी आजारी होती याबाबात सहानुभूती दाखविणे ठिक आहे, परंतु विभागाला त्यांचे कारण पटलेले नाही. त्यामुळे श्री.जोशी यांना नोटीस दिलेली आहे. ग्रामविकास विभागाचा सचिव म्हणून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. श्री.मोरे यांच्याकडून वसुली करण्यात यावी अशीही नोटीस दिलेली आहे. परंतु त्यांच्या नावावर कोणतीही मालमत्ता नसल्यामुळे ही रक्कम निर्लेखित करावी लागले असे विभागीय सचिवांनी आपले मत व्यक्त केले.

तसेच या प्रकरणी लवाद नेमता येईल काय, अशी विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, वसुलीच्या संदर्भात अहवाल आला पहिजे. श्री.मोरे यांच्याकडून ही रक्कम वसूल होऊ शकत नाही अशा प्रकारचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ही रक्कम निर्लेखित करता येईल हा एकमेव मार्ग आहे. या २२ लाख रुपयांमध्ये १८ टक्क्याप्रमाणे व्याजाची रक्कम समाविष्ट केलेली आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

नाशिक जिल्हा परिषद आवारातील उपहारगृहाचे भाडे वसुली बाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहिती वरुन जिल्हा परिषद आवरातील उपहारगृहाचे भाडे मार्च, २००५ अखेर रक्कम रु.६,०४,६९२/- एवढी भाड्याची रक्कम थकित असल्याचे दिसून येते.

नाशिक जिल्हा परिषदेच्या आवारातील उपहारगृह १९९२ साली प्रत्यक्षात नव्हते. मात्र त्या ठिकाणी पत्र्याचे १० x १० या आकाराचे तात्पुरते शेड उभे केले होते. सन १९९२ मध्ये श्री.चव्हाण या व्यक्तीने हे उपहारगृह चालविण्यासाठी घेतले होते, परंतु त्यांना उपहारगृह चालविणे परवडत नसल्यामुळे त्याने ते सोडून दिले. त्यानंतर श्री.मोरे या दांपत्याने सन १९९३ पासून सुरु असलेले सदरचेउपहारगृह चालविण्यासाठी जिल्हा परिषदेकडे अर्ज केला. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी सदरचे उपहारगृह चालविण्यासाठी तोंडी परवानगी दिली होती. त्याबाबत लेखी स्वरुपाचा आदेश दिलेला नव्हता. प्रत्यक्षात उपहारगृह सन १९९३ पासून सुरु असताना त्याचे भाडे सन १९९९ मध्ये म्हणजे ६ वर्षांनी निश्चित केलेल्या दरानूसार वसूल करण्यात आले नाही असा लेखाक्षेप आहे. त्यावेळी त्या जागेचे भाडे दरमहा ८००/- रुपये व अनामत रुपये ५,०००/- एवढी रक्कम निश्चित करण्यात आली. त्यानुसार श्री.मोरे यांनी रु.५०००/- एवढी अनामत रक्कम भरली होती.

सन १९९५ साली नवीन उपहारगृहाची इमारत तयार झाल्यांनतर ५८० चौ.फूटाच्या नवीन जागेतील त्या उपहारगृहाचे भाडे रु.४५८१/- एवढे ठरविण्यात आले. परंतु तेही भाडे देणे परवडत नाही असे श्री.मोरे यांनी जिल्हा परिषदेला कळविले होते. परंतु तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांनी सन १९९९ ते २००५ पर्यंत काही कार्यवाही केली नाही. त्यानंतर या विषयाची नस्ती जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात आली. त्यांनतर सन १९९९ ते २००४ पर्यंत ही नस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पडून राहिली.

सार्वजनिक बांधकाम विभागातील अनुरेखक श्री.जोशी यांच्याकडे सदरची नस्ती पडून राहिल्याने श्री.जोशी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तथापि, श्री.मोरे यांना वसुलीसाठी नोटीस देण्यापलीकडे विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही. **सबब, जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्याने वेळीच उपहारगृहाचे भाडे निश्चित केले नाही, यावरुन संबंधित अधिकाऱ्याने अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे दिसून येते याबाबत समितीने नापसंती व्यक्त**

करुन संबंधित अधिकारी व कार्यकारी अभियंता व अनुरेखक या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

नाशिक जिल्हा परिषदेच्या आवारातील उपगृहाच्या भाड्याची रक्कम रु.२२ लाख ४७ हजार एवढी असून सदरची रक्कम वसूल केली नाही, त्यामुळे लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतला. सदरच्या रक्कमेच्या वसूलीसाठी विभागाचा अधिक वेळ व पैसा खर्च होऊनही उपहारगृहाच्या भाड्याची रक्कम वसूल होऊ शकली नाही व होऊ शकत नाही अशा प्रकारचे प्रमाणपत्र मिळाल्यावरच सदरची रक्कम निर्लेखित करता येईल. तथापि, तसेही प्रमाणपत्र मिळालेले नाही. त्यामुळे विभागाकडे मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. निर्लेखित प्रमाणपत्राबाबत विभागाने काहीच कारवाई केली नाही. याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

सबब, समिती शिफारस करते की, उपहारागृह चालकाकडून रुपये २२ लाख ४७ हजार वसुली करण्यात यावी जर सदरची रक्कम उपहारगृह चालकाकडून वसुली होत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनातून/पेन्शनमधून वसुल करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच या पुढे जिल्हा परिषदेच्या मालकीची इमारत किंवा भुखंड भाडे तत्वावर देण्यात येतील त्यावेळेस अस्तित्वात असलेल्या अधिनियमांची काटेकोरपणे पालन करुन करारनामा करण्यात यावा असे सर्व जिल्हा परिषदांना सविस्तर परिपत्रकाद्वारे या निमित्ताने कळविण्यात यावे, अशीही समितीची शिफारस आहे.

प्रकरण चार - दोन

नाशिक, जिल्हा परिषद

ग्रामपंचायत तळवाडे (भामेर) (तालुका सटाणा) पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे कामातील अनियमितता.

(परिच्छेद क्रमांक ३.२६३)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक ८) नाशिक जिल्हा परिषदेच्या विभागाने ग्रामपंचायत तळवाडे (भामेर) (तालुका सटाणा) येथे पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्यावर सन २००४-२००५ मध्ये रक्कम रुपये १,८०,२१९ खर्च केला आहे. याबाबत मुख्य लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे अभिप्राय नमुद केले आहेत :-

१. सदर काम चेअरमन, स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था, वसोळपाडे यांना देण्यात आले होते. परंतु या ठेकेदाराने काम अर्धवट सोडल्याने त्याचा ठेका रद्द करण्यात आला. सुधारित अंदाजपत्रकानुसार नवीन ठेकेदारकडून काम करुन घेतल्यास रक्कम रुपये २,१५,२७१ चे नुकसान होणार असल्याने सदर रक्कम प्रथम ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंतिमीकरण करण्यात आलेले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२. प्रथम ठेकेदाराने जोत्यापर्यंत काम केलेले असल्याने नवीन अंदाजपत्रकामध्ये फक्त शिल्लक कामाचा समावेश करणे आवश्यक होते. परंतु त्याऐवजी पुर्ण टाकीचे अंदाजपत्रक तयार करुन रक्कम अदा केलेली आहे. त्यामुळे जोत्यापर्यंतच्या कामाचे रक्कम रुपये ६१,७९१ जादा प्रदान करण्यात आलेले आहेत. जादा प्रदानाची रक्कम संबंधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

३. नवीन ठेकेदाराकडून फक्त टाकीचे काम करुन घेण्यात आले आहे. उर्वरित कामे कोणाकडून व कोणत्या अनुदानातुन करण्यात आले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. प्रथम मक्तेदाराची मंजुर निविदेप्रामणे शिल्लक कामाची रक्कम रुपये ९२,२७१/- असुन जमीनीवरील पाण्याच्या टाकीचे स्वतंत्र निविदा काढुन काम करण्यात आले आहे. त्यासाठी रक्कम रुपये १,८०,२१९/- इतका खर्च झालेला आहे. मुळ कामाच्या रक्कमेपेक्षा रुपये ८७,९४८/- अधिक खर्च झाल्याने सदर रक्कम वसुल करणेची कार्यवाही प्रक्रियेत आहे. प्रथम ठेकेदाराने केलेल्या कामाचे अंतिम देयक विभागास प्राप्त असुन तांत्रिक तपासणी सुरु आहे. तांत्रिक तपासणीनंतर अंतिमीकरण करण्यात येईल.

२. प्रथम मक्तेदाराने जोत्यापर्यंत काम केलेले होते. तथापि, जागेत बदल झाल्याने संपुर्ण टाकीच्या कामाच्या निविदा स्वतंत्रपणे अकराव्या वित्त आयोगाच्या निधीतुन मंजूर करुन काम पुर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रथम मक्तेदाराने जोत्यापर्यंत केलेल्या कामाची रक्कम संबंधिताकडून वसुलीची कार्यवाही प्रक्रियेत आहे.

३. फक्त जमीनीवरील टाकीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त योजनेतील जी कामे अपुर्ण होती ती उपविभागामार्फत रोजंदारी मजुराकडून हजेरीपटावर करण्यात येऊन तो खर्च प्रथम मक्तेदाराच्या अनामत रक्कमेमधुन भागविण्यात आलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाण्याच्या टाकीचे काम करण्यासाठी १ लाख ८० हजार २१९ रुपये खर्च झाला. मूळ कामाच्या रकमेपेक्षा ८७ हजार ९४८ रुपये अधिक खर्च झालेला आहे. सदर रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे काय, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांनी असा खुलासा केला की, आधीचा जो मक्तेदार होता त्याने पाण्याच्या टाकीचे काम अर्धवट सोडून दिले होते. त्या पाण्याच्या टाकीच्या जागेत बदल झाल्याने टाकीचे काम स्वतंत्र निविदा काढून अकराव्या वित्त आयोगाच्या निधीतून १ लाख ८० हजार रुपये खर्च करुन पूर्ण केलेले आहे. ८७ हजार ९४८ रुपये एवढ्या रक्कमेच्या वसुलीच्या बाबतीत संबंधित मंजूर सहकारी संस्थेशी पत्र व्यवहार केलेला आहे पण संस्थेकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थेला विनंती केलेली आहे की, संबंधित मजूर सहकारी संस्थेची ज्या ज्या ठिकाणी कामे चालू असतील त्याबाबतची माहिती जिल्हा परिषदला कळवावी. याबाबत पाठपुरावा करुन वसुली करुन घेण्यात येईल.

त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, त्या मजूर संस्थेला काळ्या यादीत घातले काय, त्यावर नाही असे सांगण्यात आले. एखादा मक्तेदार काम अर्धवट सोडून जातो त्याला आपण काळ्या यादीत घालतो. आपण तसे का केले नाही. याला जबाबदार कोण, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याकडे का लक्ष दिले नाही, अशी समितीने वारंवार विचारणा केली असता, कार्यकारी अभियंत्यांनी समितीस सांगितले की, कलम ३ (क) खाली त्यांचा मक्ता रद्द केला असल्याचे सांगितले. या कामासाठी दोन लेखाशीर्षाअंतर्गत निधी वापरण्यात आला हे खरे आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर होय असे उत्तर देण्यात आले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, या कामावर आधी पाणीपुरवठा विभागाचा निधी खर्च केला आणि त्यानंतर टाकीचे काम ११ व्या वित्त आयोगातून केले हे खरे आहे काय, तसेच एकाच कामावर दोन शीर्षाखालील निधी खर्च केलेला आहे काय, त्यावर असे सांगण्यात आले की, टाकीचे काम ११ व्या वित्त आयोगाच्या निधीतून केले असल्याचे सांगितले. टाकीच्या जोत्यापर्यंतच्या कामासाठी पाणीपुरवठा विभागाचा निधी होता. टाकीच्या कामावर ११ व्या वित्त आयोगाच्या निधीतून १ लाख ८० हजार रुपये खर्च केले. या कामाच्या संदर्भात ८७ हजार ९४८ रुपयांची वसुली आहे. या कामावर दोन लेखाशीर्षातून निधी खर्च केलेला आहे. या मुद्याच्या बाबतीत संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय समितीने घेतला व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा बैठक घेवून संबंधित अधिकाऱ्यांकडून तयारी करुन घेतलेली दिसत नाही असे समितीने मत व्यक्त केले.

उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्यांबाबत माहिती मागविली :-

१. ग्रामपंचायत तळवाडे येथील पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्यासाठी नेमलेल्या मक्तेदाराने टाकीचे काम केव्हा सोडून दिले ?

२. सदर मक्तेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

३. उक्त प्रकरणी मक्तेदाराकडून येणे असलेली रक्कम रुपये ८७,९४८/- संबंधित मजुर सहकारी संस्थेकडून वसुल करण्यात आली आहे काय ?

४. असल्यास केव्हा ? उक्त रक्कम वसुल करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे ?

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने विभागाकडून व जिल्हा परिषेकडून खालील माहिती प्राप्त झाली.

ग्रामपंचायत तळवाडे (भामेर) येथील पिण्याच्या पाण्याची टाकी बांधकामासाठी नेमलेल्या मक्तेदार चेअरमन स्वामी समर्थ मजूर सहकारी संस्था वासोळपाडे संस्थेने टाकीचे काम दिनांक ३.१०.२००२ पासून काम सोडून दिले. चेअरमन, स्वामी समर्थ सहकारी मजूर संस्था वासोळपाडे ह्या मक्तेदारास काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही याबाबत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक यांना कळविण्यात आलेले आहे. अद्याप वसुली करण्यात आलेले नाही. वसुली बाबत संबंधीत मक्तेदारास पत्र दिनांक २७.७.२०१० रोजी वसुलीची रक्कम भरण्याबाबत कळविले आहे. तसेच जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थाचा संघ नाशिक यांनी वसुली करणे संबंधात कळविले आहे.

सचिवांची साक्ष :-

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदरच्या कामाची सद्यस्थिती काय आहे, त्यावर असे सांगण्यात आले की, पाण्याच्या टाकीचे काम आमदार निधीमधून करण्यात आले होते व ते काम दुसऱ्या संस्थेला देण्यात आले. कामामध्ये विहिर, पाण्याची टाकी व रायजिंग मेनचे काम ४ लाख ९८ हजार एवढ्या निधीतून करुन घेण्यात आले होते. स्वामी समर्थ मजूर सहकारी संस्था, वसोळपाडे या संस्थेला काम दिले होते. यामध्ये विहिर आणि रायजिंग मेनचे काम संस्थेने केले. परंतु पाण्याच्या टाकीचे काम संस्थेने अर्धवट सोडले. त्यानंतर संस्थेला वारंवार नोटीस देवूनसुद्धा त्यांनी काम पूर्ण केले नाही. सदरचे काम दुसऱ्या यंत्रणेकडून पूर्ण करण्यात आले त्यासाठी ८७ हजार ९४८ रुपये जास्तीचा खर्च आला. सदरची रक्कम संस्थेकडून वसूल करण्यासाठी जिल्हा उपनिबंधकांना कळविण्यात आले आहे. त्या संस्थेची मालमत्ता नसल्यामुळे त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करता आली नाही. परंतु जिल्हा उपनिबंधकांमार्फत ही रक्कम वसूल करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, जिल्हा उपनिबंधकांनी मजूर सहकारी संस्थेला काळ्या यादीत टाकले काय, त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असे सांगितले की, ही वैयक्तीक एजन्सी नसून मजूर सहकारी संस्था आहे. त्यामुळे संस्थेला काळ्या यादीत टाकण्यासाठी त्यांना अवसानायात काढावी लागेल. त्या मजूर सहकारी संस्थेकडून ८७ हजार ९४८ रुपये वसूल झाले नाहीत तर ती रक्कम वसूल करण्याबाबत

आपण उपनिबंधकांना कळविले आहे काय, अशी समितीने पुन्हा विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या मजूर सहकारी संस्थेनी ४ लाख १९ हजाराचे अर्धवट काम केले. त्या संस्थेला जादा रक्कम दिली नाही. त्यांनी अर्धवट काम सोडल्यानंतर काही वर्षानंतर हे काम दुसऱ्या यंत्रणेकडून करुन घ्यावे लागले. त्याकरिता आपल्याला जास्तीचे पैसे द्यावे लागले. यामध्ये ८७ हजार ९४८ एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. मजूर सहकारी संस्थेकडून अनामत रक्कम घेत नाहीत. एकूण ३३ टक्के कामे मजूर सहकारी संस्थेला देण्यात आली पहिजेत असे शासनाचे धोरण आहे म्हणून शासनाने ८७ हजारावर पाणी सोडून द्यावयाचे काय, अशी समितीने विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी जिल्हा उप निबंधकांना रक्कम वसूल करण्याबाबत कळविले असल्याचे सांगण्यात आले.

सदर संस्थेला महाराष्ट्रामध्ये अन्य ठिकाणी काम मिळता कामा नये. सदरची संस्था दुसरीकडे काम करीत असेल तर त्या संस्थेकडून रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हा परिषदेने जिल्हा उप निबंधकांना कारवाई करण्यास सांगितले पाहिजे. असे समितीने निर्देश दिले असता त्यावर सचिवांनी खुलासा केला की, वसुलीची कारवाई जिल्हा उप निबंधक करु शकतात. त्या संस्थेचे काम दुसरीकडे असेल तर त्याची माहिती जिल्हा उप निबंधकांना असते. सदरची संस्था काळ्या यादिमध्ये असेल तर तिला काम दिले जात नाही. आतापर्यंत जिल्हा परिषदेने ८७ हजार ९४८ एवढ्या रक्कमेच्या वसुलीबाबत काय कारवाई केली याची माहिती समितीला १५ दिवसात कळविण्यात यावी असे समितीने निर्देश दिले होते. तथापि, समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील सदर माहिती समितीला मिळू शकली नाही.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद, नाशिक येथील ग्रामपंचायत तळवाडे (भामेर) (ता.सटाणा) पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती त्याचप्रमाणे या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन ग्रामपंचायत तळवाडे (भामेर) येथील पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्याचे काम स्वामी समर्थ मजूर सहकारी संस्था वसोळपाडे या संस्थेला काम दिले होते. या मधील विहिर आणि रायजिंग मेनचे काम संस्थेने केले. तथापि, त्यानंतर पाण्याच्या टाकीचे काम संस्थेने अर्धवट सोडले. यासंदर्भात वारंवार नोटीस देवूनसुद्धा संस्थेने सदर काम पूर्ण केले नाही. त्यामुळे हे काम दुसऱ्या यंत्रणेमार्फत पूर्ण करण्यात आले त्यासाठी ८७ हजार ९४८ रुपये जास्तीचा निधी खर्च झाला. सदरच्या संस्थेची मालमत्ता नसल्यामुळे त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करता आली नाही. जिल्हा उपनिबंधकांनी मजूर सहकारी संस्थेला अद्यापही काळ्या यादीत टाकले नाही. सांगण्या पलीकडे विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही. **याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. तसेच प्रत्येक रक्कम निर्लेखीत कारणे उचित नाही असे समितीने मत व्यक्त केले.**

सबब, समिती शिफारस करते की, स्वामी समर्थ मजूर सहकारी संस्था, वसोळपाडे या संस्थेकडून ८७ हजार ९४८ रुपये एवढी रक्कम वसूल करण्यात यावी, तसेच सदर संस्थेस तात्काळ काळ्या यादीत टाकण्यात यावे. सदरची बाब सन २००४-२००५ पासूनची असून तेथील संबंधीत जिल्हा उपनिबंधकानेही वसूलीकडे दूर्लक्ष केल्याचे

निदर्शनास येते. अतः समिती शिफारस करते की, उक्त रक्कमेची वसूली व काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही त्वरीत न केल्यास संबंधीत उपनिबंधकावरही कडक कारवाई करण्यात यावी.

उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण पाच

नंदूरबार, जिल्हा परिषद

४ टक्के सादिल अनुदानातुन मुलांना बसण्यासाठी सुती बस्कर पट्या

खरेदीबाबत (परिच्छेद क्रमांक ३.४७)

जिल्हा परिषद, नंदुरबार सन २००४-२००५ (परिच्छेद क्र.२०) -६३७८ बस्कर पट्या दर प्रति नग रुपये १४२.१९ प्रमाणे पुरवठा केल्याबाबत रक्कम रुपये ९,०६,८८७ खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. :-

१. नस्ती सोबतच्या दिनांक ५ जून, २००५ चे पत्रानुसार साहित्य तालुका स्तरावर पोहोच न झाल्याचे स्पष्ट होते. आदेशातील अट क्रमांक ५ नुसार प्रतिदिन रक्कम रुपये ५०० प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. पुरवठादाराकडून दिनांक १ एप्रिल, २००५ ते ५ जून, २००५ पर्यंत एकुण ६६ दिवसांची दंडात्मक रक्कम रुपये ३३,००० वसुल करणेची कार्यवाही केलेली नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची अनियमितता असल्याने संबंधितांकडून दंडाची रक्कम वसुल करुन शासनखाती भरणा होणे आवश्यक आहे.

२. दिनांक ५ जून, २००५ च्या पत्राचा विचार करता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक पीआरसी/१०८१/सीआर-१९४०, दिनांक १४ जून, १९८९ चे उल्लंघन करुन वित्त विभागाकडून बिल पारित होणेसाठी साहित्य प्राप्त झालेचे खोटे प्रमाणपत्र नमुद केले आहे.

३. किती वस्तुंची आवश्यकता आहे याचा आढावा घेऊन खरेदी करावयाची असताना शिक्षण विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे नियम, ५३ नुसार संबंधित केंद्र शाळांकडून प्रस्ताव न मागविता खरेदी केलेली आहे.

४. सन २००३-२००४ चे प्राप्त अनुदान रक्कम रुपये ३१.३२ लक्ष हे सन २००४-२००५ मध्ये खर्च करणेबाबत शासनाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही.

५. मंजुर टिप्पणी, पुरवठा आदेश, साहित्य पुरवठा रक्कम अदा करणे इत्यादी बाबी ह्या दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी एका दिवसात साध्य करणे अशक्य असतांना विभागाने केवळ अनुदान व्यपगत होवू नये म्हणून कागदपत्रांची केवळ जुळवाजुळव करुन सदर खरेदी केल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :

१. साहित्य उशीरा पुरविले त्या बाबत विभागाने पत्र साहित्य पुरवठादाराला दिले आहे. उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार संघटना, मुंबई यांचे कडील परिपत्रक क्र. भांखस/हातमाग कापड/दरनिश्चित/(२८)/२००४/०५/अ`-२४००३ अन्वये मागणीपत्र मिळालेपासून ६ आठवड्याचे आत मालाचा पुरवठा करणेबाबत नमुद आहे. त्यामुळे पुरवठा आदेशाचे दिवसापासून उक्त कालावधी वजा जाता २१ दिवसांची प्रति दिवस ५०० x २१ = १०,५०० रक्कम संबंधिताकडून वसुल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

२. काही पंचायत समितींना ३१/३ व काही पंचायत समित्यांना साहित्य उशिरा प्राप्त झाले, ही बाब सत्य आहे. परंतु दर करार असल्याने पुरवठादाराला एकाचवेळी महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांकडून आदेश देण्यात आल्यामुळे संबंधित कंत्राटदारास साहित्य पुरविण्यास विलंब झाला असे नम्रपणे नमुद करीत आहे.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी गट शिक्षणधिकारी यांच्या सभेत बस्करपट्टीची मागणी करण्यात आली होती. गट शिक्षणाधिकारी यांच्या मागणीनुसार खरेदी करण्यात आली आहे.

४. सन २००३-०४ चे प्राप्त अनुदान महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.पीआरई-२००५/१७९/०५ प्राशि-५ दिनांक २९ नोव्हेंबर, २००५ अन्वये अखर्चीत निधी खर्च करण्यास परवानगी प्राप्त आहे.

५. नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी ६५ टक्के लोकसंख्या आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये प्राथमिक सोयी देखील पुर्ण नाहीत. खेड्यातील गरीब व आदिवासी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बस्करपट्या देणे अत्यंत गरजेचे होते. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही अनुदानात उक्त योजना घेता येत नाही. त्यामुळे प्राथमिक स्वरुपाच्या विद्यार्थ्यांच्या केवळ सोयीसाठी उक्त खरेदी करण्यात आली आहे. तरी उपरोक्त संपुर्ण परिस्थितीचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन अनुपालन मान्य करणे बाबत विनंती आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

नंदुरबार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नंदुरबार यांची दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पुरवठादाराकडून वेळेवर साहित्य पुरवठा न झाल्यामुळे दंडात्मक कारवाई म्हणून त्याच्याकडून रु.३३,०००/- इतकी रक्कम वसूल केली आहे काय, त्यावर असा खुलासा करण्यात आला की, संबंधित पुरवठादाराकडून रु.३३,०००/- इतकी रक्कम वसूल केली आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणामध्ये, काही पंचायती समित्यांना दि. ३१ मार्च व काही पंचायत समित्यांना उशिरा साहित्य प्राप्त झाल्याची बाब मान्य केली. त्याचबरोबर दरकरार असल्यामुळे पुरवठादाराला एकाच वेळी महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांकडून आदेश देण्यात आले त्यामुळे संबंधित कंत्राटदारास साहित्य पुरविण्यास विलंब झाला असे नमुद केलेले आहे. अशा प्रकारे कंत्राटदाराची बाजू घेऊन त्याचा लेखी स्पष्टीकरणामध्ये उल्लेख करणे अतिशय चुकीची बाब

असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चूक झाल्याचे मान्य करुन सदरहू कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करुन त्याला नोटीस दिली असल्याचे सांगितले.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, कंत्राटदाराने वेळेवर साहित्य पुरवठा करणे अत्यावश्यक आहे. कंत्राटदाराने वेळेवर साहित्य पुरवठा न केल्यामुळे कोणाकडून दंडात्मक रक्कमेची वसूली केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने संबंधित कंत्राटदाराकडून दंडात्मक रक्कमेची वसूली केली असल्याचे सांगितले.

समितीने दिनांक १३ ते १५ ऑक्टोबर, २०१० या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यात येणार असल्यामुळे, संबंधित पुरवठादाराला दि.११/१०/२०१० रोजी नोटीस पाठविलेली आहे, ही बाब योग्य नाही, असे समितीने मत व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या लेखा परिक्षणाबरोबर शासनाकडून सुद्धा लेखा परिक्षण केले जाते त्यावेळी सदरच्या त्रुटी आढळून आल्या होत्या काय, त्यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी साहित्य प्राप्त झाल्या संबंधिचे प्रमाणपत्र अभिलेख्यावर घेतले होते. या प्रमाणपत्रासंबंधी आपण आक्षेप घेतला होता काय, अशी समितीने विचारणा केली असता, लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतला होता असे सांगितले. यासंदर्भात जबाबदार असणाऱ्यावर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कारवाई का केली नाही, अशी समितीने विचारणा केली असता, त्यावेळी या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात आली नाही, ही बाब सत्य आहे असे सांगण्यात आले. त्यावर समितीने असे निदेश दिले की, दि. ३१/३/२००५ रोजी बस्कर पट्या मिळाल्याबाबत गट शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रामणपत्र सादर केले आहे. या प्रकरणी संबंधित शिक्षणाधिकारी यांना नोटीस काढावी व त्याबाबत समितीला एका आठवड्यात अहवाल सादर करावा. समितीच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही केली जाईल असे विभागाने समितीला आश्वासन दिले.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली :

१. जिल्हा परिषदेकडे अनुदान उपलब्ध असताना देखील आर्थिक वर्षाच्या शेवटी कागदपत्रांची जुळवाजुळव करुन बस्कर पट्या खरेदी करणे व असे करीत असतांना एकाच दिवशी पुरवठा आदेश देणे, पुरवठादराचे देयक पारीत होण्यासाठी साहित्य पुरवठा झाल्याचे खोटे प्रमाणपत्र व देयकाची रक्कम अदा करण्यात आलेली खरेदी व्यवहारासंदर्भात सविस्तर खुलासा करण्यात यावा.

२. साहित्य उशीरा प्राप्त झाल्याने शासनाच्या दिनांक ५ जून, २००५ आदेशातील अट क्र. ५ नुसार दंडात्मक रक्कम वसुल न करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित गटशिक्षण अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

३. जिल्हा परिषदेने आर्थिक वर्षाच्या शेवटी अनुदान व्यपगत होवू नये म्हणून एकाच दिवशी सर्व कागदपत्रे तयार करुन पुरवठा आदेश दिले त्यामुळे जिल्हा परिषदेला अन्य ठिकाणाहून बस्कर पट्या उपलब्ध होवू शकतात किंवा नाही यांची पडताळणी करता आली नाही याबाबत शासनाचे काय अभिप्राय आहेत, तसेच तुरुंग विभागाकडून बस्कर पट्या खरेदी करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे.

उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली :

मा.शिक्षण संचालक (प्राथ.)म रा पुणे-१ यांचेकडून ४ टक्के सादिल अनुदान सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, नंदुरबार यांना पुढील प्रामाणे अनुदान उपलब्ध झाले.

१. दि.२८/६/२००४ रुपये १८,९८,०००/-

२. दि.२७/१/२००५ रुपये ८,९५,०००/-

३. दि.२७/३/२००५ रुपये १९,६५,०००/-

एकूण : ४७,५८,०००/-

या उपलब्ध तरतुदीतून बस्करपट्टी खरेदीची कार्यवाही करण्यात आली. अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद तसेच महाराष्ट्र राज्य महासंघ मुंबई यांचेकडून बस्करपट्टीचे दर प्राप्त होते. या दोन्ही विभागाकडून बस्करपट्टीचे नमुने मागविण्यात येऊन खरेदी समिती समोर दोन्ही संस्थेचे नमुने ठेवण्यात आले. त्यांचा दर्जा व गुणात्मकदृष्ट्या विचार करुन, खरेदी समितीने, महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्या.मुंबई यांनी सादर केलेला नमुना अटी व शर्तीना अधिन राहून निश्चित करुन १४२.१९ शासन दरकरानुसार एकूण ६३७८ नगांस एकुण रु.९,०६,८८७/- चा दि.३१/३/२००५ रोजी पुरवठा आदेश देणेत आला व दि.३१/३/२००५ ला पुरवठा गटस्तरावर करण्यात येऊन गट शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेली पोहोच दप्तरी ठेवण्यात आलेली आहे.

बस्करपट्या ह्या गटस्तरावर उशिराने पोहोच झाले व खोटे प्रमाणपत्र सादर केले, या आक्षेपांचे गटस्तरावर दि.१/११/२०१० अन्वये देणेत आले त्यानुसार सर्व गट शिक्षणाधिकारी यांनी बस्करपट्या ह्या दि.३१/३/२००५ रोजीच पुरवठा झाला असून त्यानुसार पोहोच देण्यात आलेली आहे व पोहोच उशिरा देण्याचा प्रश्नच येत नाही सोबत लेखी खुलासा सादर केल्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी दि.५ जून, २००५ चे पत्र तयार केले असून ते महाराष्ट्र उद्योग हातमाग महामंडळ मुंबई यांना देणेत आलेले नाही, असा खुलासा दिलेला आहे. त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

दिनांक २७/०१/२००५ रोजीच्या प्राप्त अनुदानाच्या आधीच खरेदीची कार्यवाही विभागाकडून सुरु करण्यात आली होती. जिल्हा परिषदेने वर्षाच्या शेवटी अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून खरेदी समितीने, नमुना निश्चित केल्यनुसार संस्थेकडे मागणी नोंदविण्यात येऊन पुरवठा हा विहित कालावधीत करण्यात आलेला आहे. असे नमूद करण्यात आले आहे.

सचिवांची साक्ष :

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी समितीने सचिव, शालेय शिक्षण व ग्रामविकास विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेकडे अनुदान उपलब्ध असताना देखील, आर्थिक वर्षाच्या शेवटी कागदपत्राची जुळवाजुळव करुन, बस्कर पट्या खरेदी करणे व असे करीत असताना एकाच दिवशी पुरवठा आदेश देणे, पुरवठादाराचे देयक पारित होण्यासाठी साहित्याचा पुरवठा

झाल्याचे खोटे प्रामणपत्र देण्यात येणे व देयकाची रक्कम अदा करण्यात येणे, या तातडीने करण्यात आलेल्या खरेदी व्यवहारासंदर्भात सविस्तर खुलासा करण्यात यावा, असे समितीने निर्देश दिले असता. त्यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी सांगितले की, सन २००४-२००५ मध्ये नंदुबार जिल्हा परिषदेला ४ टक्के सादिल अनुदानाची ४७ लाख ५८ हजार एवढ्या रक्कमेचे अनुदान दिनांक २८/६/२००४, २७/१/२००५, २७/३/२००७ देण्यात आले. यापैकी ९ लाख रुपयांच्या बस्कर पट्या पुरवठा करण्याचे आदेश दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी, महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघाला देण्यात आले. त्याच दिवशी म्हणजे दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी गट स्तरावर पुरवठा करण्यात आलेला आहे. तसे पत्र प्रत्येक गट शिक्षण अधिकाऱ्यांनी दिलेले आहे. यामध्ये ज्या दिवशी पुरवठा आदेश दिले त्याच दिवशी प्रत्येक गटाला पुरवठा करण्यात आला, ही बाब शंकास्पद आहे. मार्च अखेरीस पैसे येतात आणि ते पैसे व्यपगत होऊ नये म्हणून काही खरेदी करतात आणि त्याप्रमाणे कागदपत्रे तयार करतात. पुरवठा आदेश ३१ मार्चला दिले आणि ३१ मार्चलाच पुरवठा झाला ही बाब शंकास्पद असल्याचे मत सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी नोंदविले, त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, साहित्य प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र ही बाब साक्षीमध्ये आलेली आहे.

जून, २००४ मध्ये १८ लाख रुपये प्राप्त झाले असताना, बस्कर पट्यांची खरेदी न करण्याची कारणे काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, जून, २००४ मध्ये १८ लाख रुपये मिळाले आणि जानेवारी, २००५ मध्ये जवळपास ९ लाख रुपये मिळाले. त्यावेळी का खर्च केला नाही याचे कारण काही दिसत नाही, तसेच त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या प्रमुखांनी त्या बाबतीत कोणती नोंद घेतलेली आहे, त्यांनी आधी नोंद घ्यावयाची असते आणि नंतर त्या अनुषंगाने कारवाई करावयाची असते. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काय कारवाई केली, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सदरहू अनुदान ३ भागामध्ये आल्याचे सांगितले.

सन २००४ मध्ये बस्कर पट्या खरेदी करण्यासाठी जून महिन्यामध्ये अनुदान प्राप्त झाले होते. तसेच आपल्याकडे अनुदानाची रक्कम खर्च करण्यासाठी अवधी होता, निधी असताना आणि वेळ असताना सुद्धा बस्कर पट्यांची खरेदी का केली नाही अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, याबाबत अभिलेख्यांमध्ये कोणतेही कारण नमूद केलेले दिसत नाही. त्यावेळी शिक्षण अधिकारी कोण होते, खरेदी करण्याची जबाबदारी कोणाची होती, त्यांनी जबाबदारी पार पाडली नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर नियमानुसार काय कारवाई केली अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर सांगण्यात आले की, तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी होती. एकूण ४७ लाख ५८ हजार एवढी रक्कम प्राप्त झाली, त्यापैकी ९ लाख रुपये बस्कर पट्यांवर खर्च केले असल्याचे सांगितले. कारणे दाखवा नोटीस देणे, एक वेतनवाढ रोखणे अशा पद्धतीची कोणती कारवाई केली, अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर या संदर्भात तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांना स्पष्टीकरण विचारुन कारवाई करण्यात येईल असे सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी स्पष्टीकरण दिले.

सचिव, ग्रामविकास विभागय यांनी या संदर्भात अधिकची माहिती देताना समितीस सांगितले की, ४७ लाख रुपये वेगवेगळ्या दिवशी आलेले आहेत. ही सर्व रक्कम फक्त बस्कर पट्यांसाठीच नव्हती. सादिल अनुदानातून शाळा

दुरुस्ती करणे, फर्निचर घेणे, बस्कर पट्या घेणे अशा तीन चार गोष्टी करता अनुदान होते. १८ लाख रुपयांच्या बस्कर पट्या घ्यावयाच्या होत्या असे नाही. एकूण ४७ लाख रुपये आले होते त्यातील ३४ लाख ३४ हजार रुपये शाळा दुरुस्तीवर खर्च केले. यामध्ये बस्कर पट्यांची वेगळी बाब नाही. जून, २००४ मध्ये आलेले १८ लाख रुपये त्यावेळी वापरले गेले नाहीत.

केवळ बुकींग करुन पेमेंट केले असेल तर, ही निश्चितपणे चूक झाली असल्याचे ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी मान्य केले. बस्कर पट्या कधी प्राप्त झाल्या, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, दिनांक ३१ मार्चला बस्कर पट्या प्राप्त झाल्याचे दाखविले आहे.

बस्कर पट्यांचा पुरवठा झाला का व झाला असल्यास कधी झाला, अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर बस्कर पट्या आधी आलेल्या होत्या आणि रक्कम नंतर दिलेली आहे या बाबतीत दरकरार असल्यामुळे वाटाघाटी करण्याचा प्रश्न नव्हता. बस्कर पट्या पोहोचल्या त्यानंतरच रक्कम अदा केली असा खुलासा ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी केला.

आधी बस्कर पट्यांचा पुरवठा केला त्यानंतर अनुदान आल्यावर ३१ तारखेला पेमेंट केले असे त्यांचे म्हणणे आहे. पण त्यांनी दिलेले प्रमाणपत्र असत्य होते. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केली होती. कारण बस्कर पट्या आलेल्या नव्हत्या. एक तर लेखा परीक्षकांनी काढलेला मुद्दा चुकीचा असेल किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा चुकीचा असेल. असे समितीने मत व्यक्त केले असता त्यावर विभागाच्या सचिवांनी सांगितले की, त्या बाबतीत चौकशी करुन निश्चित वस्तुस्थिती पहाण्यात येईल. या बाबतीत चौकशी करुन समितीला अहवाल देण्यात येईल, असे समितीस आश्वासित केले.

समितीने विचारणा केली की, तत्कालीन शिक्षण अधिकारी श्री.एस.डी.मोरे यांनी असा खुलासा केला आहे की, बस्कर पट्या आधी आल्या आणि नंतर रक्कम अदा केली आहे. खुलासा चुकीचा असून यामध्ये वेगळ्या तारखा दिलेल्या आहेत व या ठिकाणी दिलेल्या उत्तरामध्ये फरक आहे. त्यावर, या बाबत त्यांनी जो खुलासा केलेला आहे त्याची चौकशी करुन समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे पुन्हा सचिवांनी आश्वासन दिले.

सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस दिलेल्या उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी उप सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये चौकशी समिती नेमण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

अभिप्राय व शिफारशी :

नंदुरबार जिल्हा परिषदेने, ४ टक्के सादिल अनुदानातून मुलांना बसण्यासाठी सुती बस्कर पट्या खरेदी संदर्भात गंभीर स्वरुपाच्या अनियमिततेबाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्यासंदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेकडे सन २००४ मध्ये रुपये १८ लाख एवढे अनुदान असतानादेखील त्यातून बस्कर पट्ट्यांची खरेदी करण्यात न आल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

जिल्हा परिषदेकडे अनुदान उपलब्ध असताना देखील आर्थिक वर्षाच्या शेवटी (दिनांक ३१ मार्च, २००५) कागदपत्रांची जुळवाजूळव करुन पुरवठा आदेश देणे व त्याच दिवशी बस्कर पट्या खरेदी करणे, पुरवठादाराचे देयक पारित होण्यासाठी ज्या दिवशी पुरवठा आदेश दिले त्याच दिवशी जिल्ह्यातील सर्व गटांना साहित्याचा पुरवठा झाल्याचे खोटे प्रमाणपत्र देण्यात येणे व देयकाची रक्कम अदा करण्यात येणे, इ.बाबी देखील समितीच्या निदर्शनास आल्या.

जून, २००४ मध्ये रुपये १८ लाख प्राप्त झालेले असतांनाही बस्कर पट्ट्या त्यावेळी खरेदी न करण्याच्या कारणांची समितीने विचारणा केली असता विभागाद्वारे त्याबाबत समाधानकारक खुलासा होवू शकत नाही. त्यानंतर ३१ मार्च, २००५ रोजी म्हणजे साधारणतः एक वर्षाच्या विलंबाने उक्त एकाच दिवशी बस्कर पट्ट्यांची खरेदी व त्याच दिवशी पुरवठा झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले असता समितीने त्याबाबत सदरचा सर्व व्यवहार शंकास्पद असल्याचे मत व्यक्त केले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुद्धा सदर प्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही याबाबतही समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सचिवांच्या साक्षीमध्ये सचिवांनीही याबाबत विचारणा केली असता त्यांनी तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण घेवून कारवाई करण्यात येईल असे उत्तर दिले. याचाच अर्थ, सन २००५ मधील घटना असून सन २०१२ पर्यंत म्हणजे सुमारे ७ वर्षे याप्रकरणी संबंधीतांचे साधे स्पष्टीकरणही घेतले गेले नसल्याने सदर अधिकाऱ्यास शासन पाठिशी घालत असून पर्यायाने या अधिकाऱ्याने केलेल्या अनियमितता व गैरव्यवहारास शासन जाणीवपूर्वक दूर्लक्ष करीत असल्याचे समितीचे मत आहे.

सबब, समिती शिफारस करते की, उक्त प्रकरणी पूर्णपणे चौकशी व संबंधित शिक्षणाधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करण्यात यावा.

सन २००४ मध्ये जे १८ लाख रुपये दिले होते, त्या १८ लाख रुपयांच्या बस्कर पट्यांची खरेदी केल्या नाहीत, ही बाब समितीच्या निदर्शनास आली होती. त्यावेळी बस्कर पट्यांची खरेदी का झाली नाही, वेळेवर काम केले पाहिजे, निधी खर्च करण्याच्या बाबतीत नियोजन केले पाहिजे. कारण आपल्याला निधी येण्याची खात्री असते. शासन जे पैसे पाठविते, त्याबाबत दोन तीन माहिन्यांचे संरक्षण मिळते असे अनेक ठिकाणी होत असते, ही बाब समिती समजू शकते.

जिल्हा परिषदेच्या प्रमुखांनी त्या बाबतीत कोणती नोंद घेतली, त्यांनी आधी नोंद घ्यावयाची असते आणि नंतर त्या अनुषंगाने कारवाई करावयाची असते. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई केली नाही. याबाबत अभिलेख्यांमध्ये कोणतेही कारण नमूद केलेले दिसत नाही. त्यावेळी शिक्षण अधिकारी कोण होते, खरेदी करण्याची जबाबदारी कोणाची होती, त्यांनी जबाबदारी पार पाडली नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर नियमानुसार काय कारवाई केली. या सर्व बाबींची साक्षीमध्ये माहिती मिळणे महत्वाचे होते असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यावर सांगण्यात आले की, तत्कालीन शिक्षण अधिकारी श्री.एस.डी.मोरे यांची जबाबदारी होती. या बाबतीत जबाबदारी निश्चित करणे हा महात्वाचा विषय आहे. जबाबदारी निश्चित केली तर प्रशासनामध्ये शिस्त निर्माण होईल. आपण काम केले नाही तर कारवाई होते, त्यामुळे काम केले पाहिजे अशी भावना प्रशासनामध्ये निर्माण होईल, खालच्या

स्तरावर नियोजन करणे महत्वाचे काम आहे. ते करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची आहे. कारणे दाखवा नोटीस देणे, एक वेतनवाढ रोखणे अशा पद्धतीची कोणती कारवाई केली, त्यावर या संदर्भात तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांना स्पष्टीकरण विचारुन कारवाई करण्यात येईल असे सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी स्पष्टीकरण दिले.

सदरची रक्कम व्यपगत होऊ नये म्हणून ३१ तारखेला नोंद घेतली परंतु जिल्हा परिषदेमधील साक्षीत असे सांगण्यात आले की, ३१ मार्चला पुरवठा आदेश दिले आणि त्याच दिवशी बस्कर पट्या घेतल्या. त्यांनी त्या ठिकाणी रेकॉर्ड दाखविले तसेच पैसे दिल्याची नोंदही दाखविली. या ठिकाणी माल प्राप्त न होताच रक्कम अदा केली आहे. माल प्राप्त झाला नसतानासुद्धा, माल प्राप्त झाल्याचे प्रामणपत्र शिक्षण अधिकाऱ्यांकडून दिले गेले ते योग्य नाही. केवळ बुकींग करुन रक्कम अदा केली असेल तर, ही निश्चितपणे चूक झाली असल्याचे ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी मान्य केले.

आधी बस्कर पट्यांचा पुरवठा केला, त्यानंतर अनुदान आल्यावर ३१ तारखेला रक्कम अदा केली, पण त्यांनी दिलेले प्रमाणपत्र असत्य होते. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केली होती. कारण बस्कर पट्या आलेल्या नव्हत्या. एक तर लेखा परीक्षकांनी काढलेला मुद्दा चुकीचा असेल किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा चुकीचा आहे. असे समितीने आपले स्पष्ट मत व्यक्त केले असता त्यावर विभागाच्या सचिवांनी सांगितले की, त्या बाबतीत चौकशी करुन निश्चित वस्तुस्थिती पहाण्यात येईल. जुलै, २०११ नंतर खुलासा आलेला आहे. बस्कर पट्या आधी आल्या आणि नंतर रक्कम अदा केली या बाबतीत चौकशी करुन समितीला अहवाल देण्यात येईल. असे समितीस पुन्हा आश्वासित केले. **विभागानी चौकशी करुन अहवाल देतो असे समितीस वारंवार आश्वासन दिले परंतु अद्याप चौकशी अहवाल समितीस प्राप्त झाला नाही, याबाबत समितीने नापसंती व्यक्त केली.**

सबब, **समिती अशी शिफारस करीत आहे की, भविष्यात अशी अनियमितता होणार नाही याची काळजी घेण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे. तसेच, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविण्यात यावी.**

परिशिष्ट

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

बुधवार, दिनांक ०२ जून, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, रत्नागिरी

उ प स्थि ती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.माधावराव पवार, वि.स.स.

३. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. श्री.बच्चू कडू, वि.स.स.

५. श्री.उदय सामंत, वि.स.स.

६. श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.

७. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

८. श्री.अनिल राठोड, वि.स.स.

९. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१०. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

११. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१२. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३. ॲड.उषाताई दराडे, वि.प.स.

१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

२. श्री.जितेंद्र भोळे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा यांचे कार्यालय)

श्री.शं.ध.चव्हाण

ग्राम विकास विभाग, मंत्रालय

श्री.प्रकाश हिर्लेकर, सह सचिव

जिल्हा परिषद, रत्नागिरी

१. श्री.खुशाभाऊ शिनगारे, मुख्या कार्यकारी अधिकारी

२. श्री.दिनेश डी.डोके, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी

३. श्री.ए.एस.माने, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

४. श्री.एम.एन.दिवे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) (प्रभारी)

५. श्री.जी.व्ही.चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)

६. श्रीमती एस.अे.पाटोळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

७. श्री.डी.एस.आंधळे, वरिष्ठ लेखाधिकारी

८. श्री.जे.डी.साळुंखे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

९. श्री.बी.डी.हुलवान, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

१०. श्री.एन.एम.कोळपकर, कृषी विकास अधिकारी

११. श्री.जे.आर.विभुते, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी विभाग

१२. श्री.व्ही.बी.भाले, कार्यकारी अभियंता, चिपळूण विभाग

१३. श्री.एस.अे.होशिंग, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

१४. डॉ.एल.एस.साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

१५. डॉ.पी.बी.मयेकर, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी

१६. डॉ.श्रीमती वाय.आर.नितनवरे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (प्र)

१७. श्रीमती .व्ही.एस.शिंदे, समाज कल्याण अधिकारी

१८. श्री.अे.अे.स.कासार, उप अभियंता, जी.एस.डी.ए.

१९. श्री.जी.बी.चाळके, गटप्रममुख, जिल्हा सुलभीकरण गट, जलस्वराज्य प्रकल्प

२०. श्री.एस.बी.गुजर, गटविकास अधिकारी, मंडणगड

२१. श्री.एस.बी.माने, गटविकास अधिकारी, दापोली

२२. श्री.एस.एन.धादवड, गटविकास अधिकारी, खेड

२३. श्रीमती एस.आर.खराडे, गटविकास अधिकारी, चिपळूण

२४. श्री.एन.एस.रेवंडकर, गटविकास अधिकारी, गुहागर

२५. श्री.जी.डी.साखरे (प्रभारी), गटविकास अधिकारी, संगमेश्वर

२६. श्री.एस.एम.रेडकर, गटविकास अधिकारी, रत्नागिरी

२७. श्री.एम.एन.जाधव, गटविकास अधिकारी, लांजा

२८. श्री.एन.एम.लांधी, गटविकास अधिकारी, राजापूर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील रत्नागिरी जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

मंगळवार, दिनांक १५ जून, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा

उ प स्थि ती

१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

३) श्री. हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.

४) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६) श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

७) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

८) श्री. अण्णा बनसोडे, वि.स.स.

९) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

१०) श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

११) श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१२) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

१३) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

१४) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

१५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

१६) ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१७) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री. जितेंद्र भोळे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा)
यांचे कार्यालय, नवी मुंबई.

श्री. शं.ध. चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय

श्री. अ.ज. सुभेदार, उप सचिव (ग्रामविकास)

सातारा, जिल्हा परिषदचे अधिकारी

श्री. यशवंत शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. एच.पी. मुळूक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. एस.एस. तडकसे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. आर.के. वाघ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
श्री. टी.आर. गारळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
श्री. आर.एच. कोकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण, ए.बा. विकास सेवा योजना)
श्रीमती प्रमिला जाखलेकर, गटप्रमुख, जलस्वराज्य
श्री. महेश पालकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. एल.एल. शिंदे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. उदयसिंह भोसले, (माध्यमिक)
श्री. जी.एस. मोहिते, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर)
श्री. ए.व्ही. कांबळे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण)
श्री. टी.डी. चिंदके, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे
श्री. एस.एस. शिंदे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा
डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री. आर.आर. कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री. सी.जी. बागल, कृषी विकास अधिकारी
श्री. ए.पी. कांबळे, समाजकल्याण अधिकारी
श्री. वाय.व्ही. शितोळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रा्मीण विकास यंत्रणा
श्री. विकास पाटील, जिल्हा अधिक्षक कृष्ी अधिकारी
श्री. व्ही.एस. सिद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा
श्री. ए.एस. सोनावणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कराड
श्री. ए.आर. पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण
श्री. के.डी. सावंत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव
श्रीमती आय.व्ही. कोळी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडूज
श्री. व्ही.पी. जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माण
श्री. जी.बी. भोसले, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा
श्री. व्ही.एल. जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण
श्री. वि.मा. पवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाई
श्री. सुरेश मारकड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मेढा
श्री. गोकुळदास वि. बैरागी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील सातारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

गुरुवार, दिनांक ९ सप्टेंबर, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर

: उ प स्थि ती :

१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

३) श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स

४) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स

५) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

६) श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

७) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

८) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

९) श्री. अनिल राठोड, वि.स.स.

१०) श्री. विजयराव औटी, वि.स.स.

११) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

१२) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

१३) प्रा. सुरेश नवले, वि.स.स.

१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

१५) ॲड. उषा दराडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२. श्री.विलास आठवले, अवर सचिव
३. श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

कोल्हापूर जिल्हा परिषदेचे अधिकारी :-

१) श्रीमती जयश्री भोज, मुख्य कार्यकारी अधिकारी

२) श्री. एन.एस.ननावरे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

३) श्री. गणेश पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

४) डॉ. दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी

५) श्री. प्रमोद शिंदे, प्रकल्प संचालक

६) श्रीमती सुषमा देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण)

७) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

८) श्री. आर.पी.शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

९) श्री. शंकर तोटावार, कृषी विकास अधिकारी

१०) श्री. शरद गोसावी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

११) श्री. जी.टी.पवार, कार्य अभियंता (बांधकाम)

१२) श्री. शरद गोसावी, शिक्षणधिकारी (प्राथमिक)

१३) श्री. ए.बी.गंधे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१४) श्रीमती. वैशाली शिंदे, समाज कल्याण अधिकारी

१५) श्री. संजय राजमाने, वरिष्ठ लेखाधिकारी

१६) श्री. एम.एस.बसर्गेकर, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

१७) श्री. नरेंद्र इंदुलकर, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु. विभाग-१)

१८) श्री. डी.एस.चव्हाण, प्रभारी गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील कोल्हापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

बुधवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नाशिक

: उ प स्थि ती :

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.माधवराव पवार, वि.स.स.

३) श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

४) श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

५) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६) श्री.बच्चू कडू, वि.स.स.

७) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

८) डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

९) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१०) श्री.अनिल राठोड, वि.स.स.

११) श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१२) श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

१३) श्री.नितीन भोसले, वि.स.स.

१४) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१५) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१६) ॲड.उषा दराडे, वि.प.स.

१७) श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१८) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री.विलास आठवले, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालय

श्री.शं.ध.चव्हाण, सहायक मुख्य लेखा परीक्षक, (स्थानिक निधी) (लेखा)

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.गायकवाड, अवर सचिव

नाशिक जिल्हा परिषदचे अधिकारी

१)	श्री.बी.जी.वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी
२)	श्री.अ.बा.लांडगे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
३)	श्री.जी.बी.बेहळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
४)	श्री.वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
५)	श्री.अ.मो.महाजन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)
६)	श्री.सुनिल अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) (प्रभारी)
७)	श्री.विजय डेकाटे, गट प्रमुख, जलस्वराज्य (प्र.)
८)	श्री.न.दि.महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
९)	श्री.ब.कुं.दहिफळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१०)	श्री.ज.कौ.देवरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
११)	श्री.बा.पो.साळुंके, कार्यकारी अभियंता, इवद-१
१२)	श्री.ब.कौ.झोडगे, कार्यकारी अभियंता, इवद-२
१३)	श्री.एस.ए.शेख, कार्यकारी अभियंता, इवद-३
१४)	श्री.वाय.बी.कुळकर्णी, नोडल कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो,
१५)	श्री.एस.डी.कातकाडे, कार्यकारी अभियंता, लपा (पूर्व) (प्रभारी)
१६)	श्री.रा.लिं.सोनाळे, कार्यकारी अभियंता, लपा (पश्चिम)
१७)	श्री.पी.आर.ठाकूर, कार्यकारी अभियंता, ग्रापापु पाणी व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती
१८)	श्री.अ.दा.मोरे, कृषि विकास अधिकारी
१९)	डॉ.सु.गं.खोडवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
२०)	डॉ.अरविंद मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी (प्रभारी)
२१)	श्रीमती प्राची वाजे, समाज कल्याण अधिकारी
२२)	श्री.मो.मा.भट्ट, उप अभियंता, जीएसडीए (यांत्रिकी)

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

बुधवार, दिनं ाक १३ ऑक्टोंबर, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद, नंदुरबार

उपस्थिती

१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
३) श्री. माधवराव पवार, वि.स.स.
४) श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.
५) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
६) श्री. भाऊसाहेब कांबळे,वि.स.स.
७) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.
८) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
९) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
१०) श्री. विजयराव औटी, वि.स.स.
११) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
१२) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
१३) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
१४) ॲड. उषा दराडे, वि.प.स.
१५) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. भाऊसाहेब कांबळे, सहसचिव
श्री. विलास आठवले, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा मुंबई.

श्री. चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक

ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई.

श्री. स.सु.गांगुर्डे, कक्ष अधिकारी

जिल्हा परिषद नंदुरबार
श्री.आर.जी.कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.डी.आर. बारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एम.टी.गरकळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री.गवळे, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. आर.पी.पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
श्री.एम.डी.धांडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
श्री.बी.ए.राठोड, उप मुख्य अधिकारी (बा.क.)
श्री.रावसाहेब झाल्टे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्री.यू.ए.बिरारी, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
श्री.पी.एन.चौधरी, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)
श्री.एस.के.वळवी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री.आर.आर.मारवाडी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री.अ.स.खर्चान, कृषि विकास अधिकारी

डॉ.डी.बी. महाले, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री.एस.बी.देशमुख, जि.कृ.अधिकारी (सा)
श्री.एस.आर.पाडवी, मोहिम अधिकारी
डॉ.एस.के.तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री.विशाल फंड एन.आर.एच.एम. (डी.पी.एम.)
श्री.आर .जी.पाटील, समाज कल्याण अधिकारी
श्री.व्ही.के.पाटील, कार्यकारी अभियंता, (सर्व शि .अ.)
श्री.बी.बी.बहिरम, गट विकास अधिकरी, प.स.नंदुरबार
श्री.एस.डी.वळवी, गट विकास अधिकारी, पं.स. अक्कलकुवा
श्री.आर.एस.अहिरे, गट विकास अशिकारी, पं.स. शहादा
श्री.डी.डी.कराळे, गट विकास अधिकारी, पं.स. घडगांव
श्री.बी.एम.मिटके, गट विकास अधिकारी, पं.स. तळोदा
श्री.यु.के.खंदारे, गट विकास अधिकारी, पं.स. नवापूर
श्री.एन.व्ही.नेरकर, उप अभियंता.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने नंदूरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील नंदूरबार जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

मंगळवार, दिनांक ३ मे, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. ॲड.के.सी.पडवी, वि.स.स.

३. श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

७. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

८. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

९. ॲड.उषा दराडे, वि.प.स.

१०. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

११. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

२. श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्या लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, नवी मुंबई

श्री.रवींद्र भागवत, संचालक

विभागीय अधिकारी, मंत्रालय, मुंबई/रत्नागिरी

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.धवड, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.भूषण गगराणी, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री.दिनेश डोके, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.साबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी

श्री.साळुंके, शिक्षणाधिकारी, रत्नागिरी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दि. ६ जुलै, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.हणमंतराव पाटील, वि.स.स.

३. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

५. श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

७. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

८. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालय

श्री.र.भा.भागवत, संचालक, स्थानिक निधी लेखा

विभागीय प्रतिनिधी

वित्त विभाग

१. श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले व को)

शालेय शिक्षण विभाग

१. श्री.सुमीत मलिक, प्रधान सचिव

२. श्री.ना.ड.ऐराल, उप सचिव

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव

महिला व बालविकास विभाग

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

जलसंधारण व रोहयो विभाग

१. श्री.सुनील पोरवाल, प्रधान सचिव

२. श्री.सुनील चव्हाण, उप सचिव, जलसंधारण

३. श्री.बा.बा.नारायणकर, उप सचिव, नियोजन विभाग

४.

आरोग्य विभाग

श्री.भूषण गगराणी, सचिव

ग्रामविकास विभाग

१. श्री.सुधीर ठाकरे, सचिव

२. डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, प्रधान सचिव महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण व रोहयो विभाग, सचिव, आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, वित्त विभाग, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, जलसंधारण विभाग, उप सचिव, नियोजन विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

३. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

४. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

५. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

६. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

७. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

२. श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालय

श्री.र.भा.भागवत, संचालक, स्थानिक निधी लेखा

विभागीय प्रतिनिधी

१. श्री.स्वाधिन क्षत्रिय, प्रधान सचिव, महसूल विभाग

२. श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

३. श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग

४. श्रीमती प्रणाली चिटणीस, उप सचिव (पदुम),

५. श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, ग्रामविकास (जलसंधारण)

६. श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

७. डॉ.दिपक म्हैसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

८. श्री.नामदेव ननावरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद, कोल्हापूर

९. श्री.आर.पी.शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र.) जिल्हा परिषद, कोल्हापूर

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, पदुम, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.माधवराव पवार, वि.स.स.

३. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

५. श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.

६. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

७. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

८. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा)

श्री.र.भा.भागवत, संचालक

ग्रामविकास विभाग

श्री.सुधीर ठाकरे, सचिव

डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव

शालेय शिक्षण विभाग

श्री.सुमित मलिक, प्रधान सचिव

जलसंधारण विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव

पुशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग

श्री.अनिल डिग्गीकर, सचिव

नियोजन विभाग

श्री.अशोक जगताप, सह सचिव

जिल्हा परिषद, नंदुरबार

श्री.आर.जी.कलकर्णी, मुख्य कार्यकरी अधिकरी

डॉ.अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एम.टी.गरकळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात नंदुरबार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सह सचिव, नियोजन विभाग, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.के.सी.पडवी, वि.स.स.

३. श्री.हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.

४. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

५. श्री.दिवाकर रावते, वि.स.स.

६. प्रा.सुरेश नवले, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालय

श्री.र.भा.भागवत, संचालक, स्थानिक निधी लेखा

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव (रो.ह.यो. व जलसंधारण)

श्री.सुधीर ठाकरे, सचिव (ग्रामविकास व पंचायत राज)

श्री.नारायणकर, सह सचिव

श्री.सुनील चव्हाण, उप सचिव

नगरविकास विभाग

श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (२)

शालेय शिक्षण विभाग

श्री.संजय कुमार, प्रधान सचिव

गृह विभाग

श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव (तुरुंग)

श्री.प्रकाश पवार, अपर पोलीस महासंचालक (कारागृह)

श्री.बिपीन बिहारी, कारागृह उपमहानिरीक्षक, (पूर्व विभाग) नागपूर

श्री.वाय.डी.देसाई, अधीक्षक, ठाणे मध्यवर्ति कारागृह

सामाजिक न्याय विभाग

श्री.दिनेश वाघमारे, सचिव

जिल्हा परिषद, नाशिक

श्री.रणजीतकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, प्रधान सचिव (तुरुंग), गृह विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

दिनांक - १७ एप्रिल, २०१२
स्थळ : विधान भवन, मुंबई
उपस्थिती

समिती प्रमुख :

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती सदस्य :

२ श्री. माधवराव पवार, वि.स.स.
३ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.
४ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
६ श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.
७ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
८ श्री. सुरेश खाडे, वि.स.स
९ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
१० श्री. नितीन भोसले, वि.स.स.
११ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
१२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.
१३ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.
१४ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या नवव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.